मुलांचे शैक्षणिक मागासलेपण ही केवळ शैक्षणिक समस्या नसून ती सामाजिक चिंतेचीही बाब आहे. ती सोडविण्यासाठी नुसती भावनिक सहानुभूती पुरेशी नाही. त्यासाठी शास्त्रीय दृष्टिकोनाची व उपचारपद्धतींचीही नितांत गरज आहे.

आकाराने लहान, पण आशयाने समृद्ध असलेल्या या पुस्तकाचा पाठक व शिक्षक यांना निश्चित लाभ होऊ शकेल. छोटी छोटी प्रकरणे व शैलीचा नेटकेपणा आणलेली. लेखकाचे सखोल चिंतन, प्रदीर्घ व्यासंग व अनुभवसिद्ध गाळशुध्द विवेचन ही या लेखनाची जमेची बाजू आहे.

वि. वि. चिपळूणकर
शिक्षण तज्ञ

चक्षु प्रकाशन, औरंगाबाद

मूल्य-५० रु

मुलांच्या क्षमता आणि शैक्षणिक समस्या

डॉ. ए. ए. कादरी



मुलांच्या क्षमता आणि शैक्षणिक समस्या

Mulanchya Kshamta Aani Shaikshanik Samasya

डॉ. ए. ए. कादरी (C) Dr. A. A. Kadri

प्रथमावृत्ती २००७

प्रकाशक :
चक्षू प्रकाशन
सौ. स्मिता संदीप दहाड
दु. क्र. ५, २१८/६, शॉपिंग सेंटर
एन - १, सिडको, औरंगाबाद.
दूरध्वनी : ९४२२७७५५२७

पत्रव्यवहारासाठी पत्ता :
सुबोध जोशी
नवश्री बुक स्टॉल,
दत्त मंदिरासमोर, औरंगपुरा, औरंगाबाद.
दूरध्वनी (०२४०) २३४५६५३.

अक्षरजुळणी :
वरद कॉम्प्युटर्स
मयूरनगर, औरंगाबाद.
दूरध्वनी : (०२४०) २३९०४९२

मुद्रक :
प्रिन्टवेल, एमआयडीसी चिकलठाणा, औरंगाबाद.

मूल्य : रु. ५०/-

प्रस्तावना

डॉ. ए.ए. कादरी हे मराठवाड्यातील एक ख्यातनाम मानसोपचार तज्ज्ञ आहेत. मानसोपचार करण्यासाठी त्यांनी औरंगाबाद येथे एक मोठे इस्पितळ उभे केले आहे; परंतु केवळ पैसे कमविणे हा त्यांचा कधीच उद्देश नाही. समाजातील मनोविकार नष्ट व्हावेत, या तळमळीपोटी ते आपले इस्पितळ चालवितात. त्यामुळे तेथे सामान्य परिस्थितीमधून आलेले मनोरुग्ण मोठ्या प्रमाणात असतात. एवढेच नाही तर मनोविकारांसंबंधी समाजामध्ये जागरूकता निर्माण व्हावी, या उद्देशाने ते अनेक उपक्रम राबवितात. विशेषत: प्रदर्शने भरविणे, समुपदेशनाचे विविध कार्यक्रम राबविणे यासारखे अनेक उपक्रम ते करीत असतात. या उपक्रमांचाच एक भाग म्हणजे त्यांचे लेखन आहे. आतापर्यंत त्यांनी मनोविकारांसंबंधी विपुल लेखन केले आहे. मराठीबरोबरच त्यांनी उर्दूमध्येही लेखन केले आहे. समाजातील अनेक लोकांना शारीरिक विकार असतात हे माहीत असते, परंतु माणसाला मनाचे विकार होतात, यावर मात्र त्यांचा विश्वास नसतो. परंतु मनोविकारांमुळेच समाजामध्ये अनेक समस्या निर्माण होत असता याची जाणीव समाजामध्ये निर्माण व्हावी आणि समाज अधिक निकोप व्हावा या हेतूनेच डॉ. ए. ए. कादरी लेखन करीत असतात. या हेतूनेच त्यांनी शिक्षण क्षेत्राशी संबंधित असणारे हे दुसरे पुस्तक लिहिले आहे. हे पुस्तक शैक्षणिक क्षेत्राशी संबंधित असणाऱ्या शिक्षक, मुख्याध्यापक आणि संस्थाचालक यांना उपयोगी तर होणार आहेच, परंतु ते पालकांना निश्चितच मार्गदर्शक होईल, अशी मला खात्री वाटते.

शिक्षण क्षेत्रात सध्या असंख्य समस्या निर्माण झाल्या आहेत. त्या सर्व समस्या महत्त्वाच्याच आहेत, परंतु सगळ्यात महत्त्वाची समस्या

असते मुलांमध्ये असलेल्या क्षमतेची. विद्यार्थ्यांची क्षमता आणि त्याला देण्यात येणारा अभ्यासक्रम यात पुष्कळदा काहीच मेळ असत नाही. सर्वच पालकांना वाटते की, आपल्या पाल्याने जास्तीत जास्त पैसा मिळविणारे शिक्षण घ्यावे. अशा प्रकारची अपेक्षा करणे काही गैर आहे, असे नाही. परंतु पालक जेव्हा आपल्या पाल्यांवर आपल्या अपेक्षा लादतात, तेव्हा त्या विद्यार्थ्यांची क्षमता नसेल तर मात्र तो विद्यार्थी सैरभैर होतो. त्यातून आत्महत्येपर्यंत ती मुले जातात. याचे कारणच असे की, या सगळ्या प्रकारातून मानसिक ताण निर्माण होतात. क्षमता नसताना आणि आवड नसतानाही घ्यावे लागणारे शिक्षण पुष्कळदा त्या विद्यार्थ्यांचे जीवन उद्ध्वस्त करते. अशा सगळ्या समस्यांचे भान देणारे आणि शिक्षण क्षेत्रातील सगळ्यांनाच – विशेषतः पालकांना जागरूक करणारे हे पुस्तक आहे.

मुलांमधील शिक्षणविषयक अनेक प्रश्न त्यांच्या मेंदूच्या रचनेमुळे निर्माण होतात. म्हणजे मेंदूमध्ये काही भाग असे असतात की, ज्यामुळे त्यांना विविध प्रश्नांना सामोरे जावे लागते. उदा. पुष्कळ विद्यार्थ्यांना लिहिण्यामध्ये अडचणी निर्माळा होतात. पुष्कळ विद्यार्थी डाव्या हाताने लिहितात. पुष्कळ विद्यार्थ्यांना वाचताना अडचणी येतात. काही विद्यार्थ्यांना भाषेमध्ये गती असते, तर काही विद्यार्थ्यांना गणित आणि विज्ञानामध्ये गती असते. काही मुले एवढी चंचल असतात की त्यांचे चित्त कुठे एका ठिकाणी स्थिर होत नाही. काही विद्यार्थ्यांची स्मरणशक्ती अतिशय कमजोर असते. विशेष म्हणजे हे सारे घडते ते नैसर्गिकरित्या. त्यांच्या मेंदूच्या विशिष्ट अशा रचनेमुळे हे सारे घडते. आणखी एक फार महत्त्वाची समस्या म्हणजे आपण साऱ्याच मुलांना सारखेच शिक्षण देतो. काही मुले अशी असतात की, त्यांना ज्या विषयात आवड असते, ते विषय शिकविलेच जात नाहीत. अशा परिस्थितीत ती मुले इतर मुलांपेक्षा मागे पडू शकतात. याचा अर्थ असा की, साऱ्यांना सारखेच शिक्षण देणे हेच मुळात अनेक समस्या निर्माण होण्यास कारण आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या शिक्षणविषयक अक्षमता लक्षात घेतल्या नाहीत, तर त्यांच्यामध्ये न्यूनगंड निर्माण होतो. हा न्यूनगंड वाढत गेला तर त्याची परिणती म्हणून त्या विद्यार्थ्यांत शिक्षणविषयक अरूची निर्माण होते. पुष्कळदा अशी मुले गुन्हेगारीकडे वळतात. कॉप्या करतात. आत्महत्याही करतात.

याचा अर्थच असा की शिक्षणविषयक प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी त्याच्या मेंदूची ठेवण समजून घेण्याची गरज आहे. त्याबरोबरच शिक्षणामध्ये काही बदल करण्याचीही गरज आहे. तसेच त्या त्या विद्यार्थ्यांची क्षमता तपासून घेतली व त्याप्रमाणे शिक्षण दिले तर पुष्कळ प्रश्न मार्गी लागू शकतील. या सगळ्या बाबींचे फार सविस्तर असे विवेचन डॉ. ए. ए. कादरी यांनी केले आहे. साध्या, सोप्या भाषेमध्ये त्यांनी आपले विवेचन केलेले असले तरी शास्त्रीय पाया मात्र त्यांनी सोडलेला नाही. अनेक ठिकाणी त्यांनी मेंदूच्या आकृत्या दिलेल्या आहेत. बुद्ध्यांक काढण्याच्या चाचण्या दिलेल्या आलेत. आणि साऱ्यातून त्यांनी आपल्या या पुस्तकाला एक भक्कम शास्त्रीय बैठकही दिली आहे.

या पुस्तकाचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ज्या मुलांमध्ये विविध प्रकारच्या शिक्षणविषयक अक्षमता असतात, त्यांच्यासाठी विशेष योजना केल्या पाहिजेत. हे जर केले नाही तर त्या मुलांचा विकास होणार नाही तसेच मेंदूच्या रचनेनुसार शिक्षण दिले पाहिजे असेही ते सुचवितात. हे महत्त्वाचे आहे. त्या दृष्टीने एका विद्यार्थ्याने आपल्या आईला लिहिलेले काव्यरूप पत्र या दृष्टीने वाचनीय आहे. नुसते वाचनीय नाही तर पालकांना काही शिकविणारेही आहे.

एकंदरीत शास्त्रीय माहितीने भरलेल्या परंतु साध्यासोप्या भाषेत लिहिलेल्या या छोटेखानी पुस्तकाचा शिक्षणक्षेत्रात कार्य करणाऱ्या साऱ्याच घटकांना फारफार उपयोग होणार आहे. शिक्षक, मुख्याध्यापक, संस्थाचालक आणि विशेषतः पालक यांनी हे पुस्तक जरूर वाचले पाहिजे असे मला वाटते.

नागनाथ कोत्तापल्ले
कुलगुरू
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
विद्यापीठ औरंगाबाद.

शुभेच्छा !

देशाचे भवितव्य आज वर्गावर्गातून घडते आहे, हे कोठारी आयोगाचे विधान अतिशय सार्थ आहे. शिक्षणातून आज घडणारी मुले राष्ट्राचे भविष्य घडविणार आहेत, म्हणूनच मुलांचे आजचे घडणे हे देशाच्या प्रगतीच्या दृष्टीने अतिशय महत्त्वपूर्ण आहे. मुलांच्या आजच्या शैक्षणिक स्थितीचे अवलोकन केले असता अनेक समस्या जाणवतात तसेच प्रत्येक महत्त्वाच्या टप्प्यांवर निकालांची टक्केवारी नापासांची चिंता करावयास भाग पाडते. नापासांच्या कारणांचा शोध घेतला तर लक्षात येते की, अनेक कारणांपैकी महत्त्वाचे एक कारण म्हणजे विद्यार्थ्यांची अध्ययन अक्षमता.

अध्ययन अक्षम विद्यार्थ्यांचे वेगळेपण लक्षात न घेता त्यांच्यावर पालक, शिक्षकांकडून लादले गेलेले अपेक्षांचे ओझे, लादला गेलेला अभ्यासक्रम, मुलांची घुसमट वाढवित जातात आणि ही मुले व्यक्तिगत जीवनात, कुटुंबात, समाजात अनेक प्रश्नचिन्हे उमटवीत जातात.

याची गंभीर दखल घेऊन शासनाने अशा अध्ययन अक्षम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाला गती देण्याच्या दृष्टीने शासन निर्णय जारी केला आहे, परंतु निर्णयाची परिणामकारक अंमलबजावणी होण्यासाठी व विद्यार्थ्यांना न्याय मिळण्याच्या दृष्टिकोनातून पालक, शिक्षक, प्रशासक यांची मानसिकता बदलून निर्णयाविषयी सजगता निर्माण होणे आवश्यक आहे.

सध्याच्या स्पर्धेच्या युगातील मुलांमध्ये वाढत जाणारी घुसमट कमी व्हावी या उद्देशाने डॉ. ए. ए. कादरी यांनी स्वत:चा व्यासंग व अनुभवावर आधारित विवेचन केले आहे. हे विवेचन शास्त्राधारीत असले तरी सोप्या भाषेत रुपकांच्या आधारे सहज स्पष्ट झाले आहे.

क्षमताधिष्ठित अध्ययन अध्यापनाचा दृष्टिकोन स्वीकारल्यावर क्षमता विकसनाच्या दृष्टीने शिक्षणाचा विचार महत्त्वाचा ठरतो. अध्ययन अक्षमता असलेली सर्व मुले सारखीच नसतात, प्रत्येकाची अक्षमता वेगळ्या प्रकारची असू शकते आणि त्यामुळे त्यांचे हे वेगळेपण लक्षात घेऊन त्यांना दिली जाणारी वागणूक, केले जाणारे अध्यापन वेगळे असणे आवश्यक ठरते.

त्या दृष्टीने अध्ययन अक्षमतांचे विविध प्रकार, त्यांची लक्षणे, कारणे व त्यासाठी वापरावयाच्या विविध अध्यापन पद्धती, द्यावयाच्या सकारात्मक सूचना यांविषयी डॉ. कादरी यांनी उपयुक्त विवेचन केले आहे. त्याचा उपयोग पालक, शिक्षक व प्रशासकांनी योग्य प्रकारे केल्यास शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणातील काही प्रश्न निश्चित सोडविता येतील, असा विश्वास वाटतो.

डॉ. ए. ए कादरी यांनी मुलांविषयी वाटणाऱ्या तळमळीतून पालक, शिक्षक, प्रशासकांना केलेले हे मार्गदर्शन बालविकासात महत्त्वाचा टप्पा ठरावे व त्यातून व्यक्तिगत, सामाजिक, शैक्षणिक समस्या सोडविण्यास हातभार लागावा, ही सदिच्छा.

एम. आर. देशमुख
विभागीय शिक्षण उपसंचालक
औरंगाबाद.

तारीख : १६/११/२००६

शुभेच्छा

व्यक्ती तितक्या प्रकृती या न्यायाने 'मुले तितकी मनें' ही नवी दृष्टी मानसशास्त्राने आपल्याला दिली आहे. प्रत्येक मुलाची बुद्धिमत्ता वेगळी, अभियोग्यता वेगळी, आवडीनिवडी वेगळ्या, इच्छा-आकांक्षा वेगळ्या. ही व्यक्तिगत भिन्नता ध्यानात घेऊन प्रत्येकाला आपापल्या बुद्धीनुसार व पात्रतेनुसार शिक्षण घेण्याचे, आपल्या आवडी-निवडीचा विकास करून घेण्याचे स्वातंत्र्य असले पाहिजे, तशी संधी त्यांना मिळाली पाहिजे. यालाच आपण बालककेंद्री शिक्षण असेही संबोधतो. सब घोडे बारा टक्के हा नियम विद्यार्थ्यांच्या बाबत लावता कामा नये.

जितकी डोकी तितकी मते,
जितकी शिते तितकी भुते,
कोणी मवाळ कोणी जहाल
कोणी सफेद कोणी लाल
कोणी लठ्ठ, कोणी मठ्ठ
कोणी ढिले कोणी घट्ट
कोणी कच्चे, कोणी पक्के
सब घोडे बारा टक्के !

'मूल ही केवळ मोठ्या माणसाची लहान आवृत्ती नव्हे' मुलाला स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असते, त्यालाही स्वत:चे मन असते, इच्छा आकांक्षा असतात, म्हणून शिक्षणात मुलाचा प्रामुख्याने विचार केला जावा असा बालककेंद्री दृष्टिकोन रुसोने आग्रहीपणे प्रतिपादित केला.

मूल ही मोठ्या माणसाची लहान आवृत्ती नव्हे ही संकल्पना स्वीकारणे आज अत्यंत गरजेचे आहे. आपल्या आशा आकांक्षा आपण आपल्या मुलांवर लादतो व तेथेच खऱ्या अर्थाने मुलांच्या मनोविकाराला सुरूवात होते. Burdenless Education 'ओझ्याविना शिक्षण' हा विचार आता शिक्षण क्षेत्रात मूळ धरत आहे, परंतु नुसतं ओझ्याविना शिक्षण म्हणजे दप्तराचे ओझे कमी करून चालणार नाही, तर पालकांनी अपेक्षांचं ओझंही कमी करणं आवश्यक आहे.

मुलांचे अंतरंग समजण्यासाठी 'मुलांच्या क्षमता आणि शैक्षणिक समस्या' हे डॉ. ए. ए. कादरी यांचं पुस्तक निश्चितच मनोविकारशास्त्रात मैलाचा दगड ठरेल. या क्षेत्रातला आपला एकूण अनुभव या पुस्तकात प्रतिबिंबित झाल्याचे दिसून येते. व्यवसायव्यस्ततेतून केलेले लिखाण निश्चितच वंचितांना मार्गदर्शक ठरेल. कार्याबद्दल हार्दिक शुभेच्छा !

व्यंकटराव नेटके
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, औरंगाबाद.

मुलांच्या निकोप वाढीसाठी अमृत विचार

शिक्षण ही एक व्यापक अशी संकल्पना आहे. बालकाचा शारीरिक, मानसिक आणि बौद्धिक विकास म्हणजे शिक्षण होय, असे महात्मा गांधींनी म्हटले आहे. खरंच मुलांच्या शिक्षणाचा संबंध त्यांच्या बुद्धिमत्तेशी असतो. प्रसन्न मनाने शाळेत येणारा विद्यार्थी शाळेच्या प्रसन्न वातावरणात खऱ्या अर्थाने रमतो. म्हणूनच रवींद्रनाथ टागोरांनी 'शांतिनिकेतन' ही शाळा निसर्गाच्या सान्निध्यात सुरू केली. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभूती देण्याचं काम शिक्षणाने केले पाहिजे. आजचा बालक उद्याच्या उज्ज्वल राष्ट्राचा पाया आहे. म्हणूनच त्याचा मानसिक विकास होणे महत्त्वाचे आहे.

आजच्या शाळेतले वातावरण, शाळेचे नियम, दप्तराचे ओझे आणि आकलन क्षमतेपेक्षा अवघड असा अभ्यासक्रम यातून विद्यार्थी घडणार का? मुलांना घडविण्यात दोनच मुख्य घटक आहेत : एक मुलांचे घर, आणि दुसरे म्हणजे शाळा. आजच्या स्पर्धेच्या युगात आई-बाबा, शिक्षक सगळेच स्पर्धेच्या मागे धावत आहेत. त्यातून ते आपल्या मुलांना पाहिजे तेवढा वेळ देऊ शकत नाहीत. पालकांच्या मुलांकडून अपेक्षाही जबरदस्त वाढल्या आहेत. या दोन्ही डगरींवर पाय देऊन चालणे मुलांना मुश्किल झाले आहे. त्यांचे बालपण पालकांच्या वाढत्या अपेक्षांच्या या ओझ्याने कोमेजून जाते. त्यांच्या मनाचा विचार आजच्या परिस्थितीत होत असेल असे मला तरी वाटत नाही. मुलांचा अभ्यासक्रम ठरवताना त्यांची आवड आणि मानसिकता लक्षात घ्यावी. एखादा मुलगा गणितात हुशार नसतो परंतु तो उत्कृष्ट लेखक, चित्रकार होऊ शकतो.

आजच्या शिक्षकांनी आणि पालकांनी मुलांच्या मानसिकतेबरोबरच त्यांच्या आवडीचा विचार करून त्यांना तसे शिक्षण द्यावे. शाळांनी अभ्यासक्रमांची निवड त्या पद्धतीने करावी आणि मुलांच्या आवडीचा अभ्यासक्रम शिकविणाऱ्या शाळा निर्माण व्हाव्यात. मुलं अभ्यासात निरुत्साही होतात. त्यांच्या मनाचा विचार केला जात नाही, या परिस्थितीला केवळ पालक आणि आजची शिक्षणपद्धती खऱ्या अर्थाने जबाबदार आहे. मुलांच्या मनाचा आणि आकलन क्षमतेचा विचार जरूर व्हायला हवा. डॉ. कादरी यांचे 'मुलांच्या क्षमता आणि शैक्षणिक समस्या' हे पुस्तक खऱ्या अर्थाने पालकांसाठी 'गुरू'ची भूमिका पार पाडेल. या पुस्तकातील अनेक प्रकरणांतून पालकांना, शिक्षकांना योग्य मार्गदर्शन केले आहे. मुलांची मानसिकता सुधारण्यासाठी काय करायला हवे, हे डॉ. कादरी यांनी अगदी सोप्या पद्धतीने परंतु चिकित्सक अध्ययनातून मांडले आहे.

शाळेत होणारी शिक्षा आणि तिचे दुष्परिणाम अशा महत्त्वाच्या प्रकरणाचा परामर्श कादरी यांनी सदरील पुस्तकात घेतला आहे. या पुस्तकातली शिक्षा न देणारी शाळा अशी एक अभिनव बक्षीस योजना वाचण्यात आली. या बक्षीस योजनेतून अनेक शाळा आणि शिक्षक धडा घेतील, अशी आशा व्यक्त करायला हरकत नाही. आजच्या ताण-तणावाच्या वातावरणात मुलांना सकारात्मक घडवणे ही काळाची गरज आहे. मुलांची मानसिक वाढ, त्यांचे स्वास्थ्य त्यांच्या निकोप वाढीसाठी आवश्यक असते. हे पुस्तक या निकोप वाढीत नक्कीच भर टाकील.

निराश झालेल्या मुलांना आशादायी बनविण्याचे काम डॉ. कादरी यांनी हाती घेतले आहे. हे पुस्तक त्यांचे पहिले पाऊल असेल आणि बालमन जपण्यासाठी यापुढे अनेक उपक्रम डॉ. कादरी यांनी घ्यावेत त्यासाठी आमचे सहकार्य राहील. या पुस्तकातील अनेक शास्त्रीय पद्धती, डॉक्टरांचे स्वानुभव कोमेजलेल्या बालमनांना प्रफुल्लित करतील, ही अपेक्षा.

अंकुशराव कदम
सचिव
महात्मा गांधी मिशन, औरंगाबाद.

बाह्य रूपाकडून अंतर्मनापर्यंत

मुलांमध्ये मानसिक समस्या वाढण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. मानसिक समस्या वाढण्याचे प्रमुख कारण वाढता तणाव आणि स्पर्धा. या तणावाला आणि स्पर्धेला तोंड देण्यासाठी जास्त क्षमता असणे आवश्यक आहे. ज्यांच्यामध्ये असलेल्या पद्धतीला तोंड देण्याची क्षमता कमी असते, त्यांच्यात वेगवेगळ्या समस्या निर्माण होतात.

अभ्यासासाठी आवश्यक असलेल्या क्षमता कमी असणाऱ्या मुलांची संख्या २० - २५% आहे. त्यामुळे बऱ्याच मुलांना त्यांच्या क्षमतेअभावी शिक्षेला, अपमानाला सामोरे जावे लागते आणि त्यामुळे शाळा सोडणाऱ्या मुलांची बरीच उदाहरणे मी पाहिली आहेत.

बरीच मुले कसेबसे गुण घेऊन परीक्षा पास होतात किंवा शालेय शिक्षण घेतात. मात्र त्यांच्यात असलेल्या खास गुणांना वाव मिळत नाही. कारण त्या गुणांचा शिक्षणपद्धतीत समावेश नाही. त्यामुळेही बरीच मुले निराशेच्या गर्तेत ओढली जातात आणि त्यामुळे उपचारासाठी येणाऱ्या अशा मुलांचे प्रमाणही बरेच आहे.

मुलांची क्षमता, बुद्धिमत्ता ही भिन्न असते. बऱ्याच मुलांमध्ये शिकण्यासाठी आजच्या पद्धतीत आवश्यक असलेले लिहिणे, वाचणे यांची क्षमता कमी असते. तो अभ्यासक्रम अशी मुले पेलू शकत नाहीत. त्यामुळे त्यांच्यात न्यूनगंडाची भावना निर्माण होते. वेगवेगळे मानसिक आजार त्यांना जडतात आणि त्याचा परिणाम त्यांच्या संपूर्ण आयुष्यावर होतो.

त्यामुळे लहानपणीच, शाळेत जर मुलांची क्षमता तपासून घेऊन त्याप्रमाणे त्यांच्याकडून अपेक्षा केल्यास व ज्या मुलांमध्ये या क्षमतांची कमतरता आहे त्यांना शासनाने सवलती दिल्या आहेत त्यांचा योग्य वापर करून त्या सवलतींचा विद्यार्थ्यांना फायदा करून दिल्यास त्यांच्यावरील ताण कमी होईल. त्यांना अपयशाला किंवा निराशेला सामोरे जावे लागणार नाही. त्यांच्यात न्यूनगंड निर्माण होणार नाही आणि आपले भविष्य ते अधिक सुखकर करू शकतील. बऱ्याच वेळा विद्यार्थ्यांना शिक्षेला सामोरे जावे लागते व त्याचे दुष्परिणाम या निष्पाप मुलांना आयुष्यभर भोगावे लागतात, हेसुद्धा बंद होईल.

या सर्व समस्यांची जाणीव करून देण्यासाठी हे पुस्तक लिहिण्याचा माझा संकल्प आहे. याचा उपयोग पालक, शिक्षक आणि या क्षेत्राशी निगडित सर्वांनाच होईल अशी आशा मी बाळगतो.

डॉ. ए. ए. कादरी

अनुक्रमणिका

१.	थोडंसं मुलांच्या मानसिकतेबद्दल...	१५
२.	बुद्धिमत्ता	१७
३.	बहुविध बुद्धीक्षमता	२१
४.	मुलांमधील शैक्षणिक समस्या : उपजत की मानवनिर्मिती ?	२४
५.	अध्ययन अक्षमता (डिस्लेक्सिया) Dyslexia	२९
६.	लिहिण्या-वाचण्याची अक्षमता का निर्माण होते ?	३५
७.	उपचारात्मक उपाय (रिमिडिएशन)	३८
८.	अभ्यासाचे कौशल्य	४१
९.	मुलांमधील आत्मविश्वास वाढविण्याची गरज	४४
१०.	अध्ययन अक्षमतेचा इतिहास	४५
११.	बारावीनंतर काय ?	५२
१२.	मुलांच्या मानसिक समस्या	५३
१३.	शाळेत होणारी शिक्षा आणि तिचे दुष्परिणाम	६०
१४.	पालकांनी घ्यावयाची काळजी	६४
१५.	मतिमंदत्व : मुलांची समस्या	६६
१६.	अध्ययन अक्षमता तपासणी	७४
१७.	मुलांसाठी परिणामकारक सूचना	७६

१. थोडंसं मुलांच्या मानसिकतेबद्दल...

मुलांची योग्य मानसिक वाढ व त्यांचे मानसिक स्वास्थ्य त्यांच्या निकोप वाढीसाठी आवश्यक असते.

मुलांच्या शारीरिक आजारांकडे आई-वडील लक्ष देतात. मात्र त्यांच्या मानसिक वाढीकडे व मानसिक स्वास्थ्याकडे दुर्लक्ष होते. त्याचे कारण मानसिक आजार सहजासहजी लक्षात येत नाहीत आणि दुसरे म्हणजे मुलांना मनोविकार होऊ शकतो, हे बऱ्याच जणांना पटत नाही.

बरेच लोक हा प्रश्न विचारतात, "मुलांना मानसिक ताण कसा होणार? त्यांना तर कसली काळजी, चिंता नसते. त्यांना मनोविकार का व्हावा?" मात्र ते ही गोष्ट विसरतात की, मुले ही मोठ्या माणसांपेक्षा जास्त संवेदनाक्षम असतात. घरातील घडामोडींबद्दल जास्त भावनाप्रधान असतात.

मुलांचे त्यांच्या आई-वडिलांशी व घरातील इतर व्यक्तींशी संबंध महत्त्वाचे असतात. मुलांच्या चांगल्या वाढीसाठी त्यांचे त्यांच्या आईशी चांगले, स्नेहाचे आणि जवळचे संबंध असणे आवश्यक आहे. मुलांवर सभोवतालच्या घडामोडींचा खूप प्रभाव पडतो.

मुलांना घरानंतर सगळ्यात महत्त्वाचे ठिकाण म्हणजे शाळा. येथे

त्यांचे सामाजिकीकरण होते आणि त्यांना चांगले वातावरण मिळाले तर त्यांचे व्यक्तिमत्त्व चांगल्या प्रकारे घडू शकते. सकारात्मक वातावरण आवश्यक आहे. नकारात्मक वातावरणाचे विपरीत परिणाम होतात. घरातील वातावरणाचा परिणाम सहजरीत्या होतो. बऱ्याच वेळा सभोवतालचे वातावरण चांगले असूनदेखील मनोविकाराची लक्षणे मुलांमध्ये दिसून येतात. त्याला अनुवांशिक, शारीरिक, सामाजिक बदल कारणीभूत असतात.

काही बदल लहानपणीच ओळखले आणि त्यावर योग्य उपचार केले तर मोठेपणी ते मानसिकदृष्ट्या सुदृढ राहू शकते.

कोणत्या लक्षणास किती महत्त्व दिले पाहिजे व किती काळजी घेतली पाहिजे हेसुद्धा आई-वडिलांच्या आणि शिक्षकांच्या लक्षात येणे आवश्यक आहे.

काही लक्षणे वाढत्या वयाबरोबर कमी होतात. मात्र, ती कमी झाली नाहीत तर त्यांची वेळीच दखल घेणे आवश्यक आहे.

बऱ्याच वेळा नको त्या लक्षणांचादेखील बराच बाऊ केला जातो, तेदेखील अयोग्य आहे.

मुलांपेक्षा जास्त प्रश्न मुलींच्या बाबतीत उद्भवतात. मुलींना मनोविकारतज्ज्ञांना दाखविल्यावर मनोविकार आहे, हे लक्षात आल्यानंतरदेखील उपचार टाळले जातात. कारण भीती असते की मुलींना मनोविकार आहे हे सांगितल्यावर तिचे लग्न होणार नाही. त्यामुळे योग्य वेळी उपचार न झाल्याने आजार जुना होतो व नंतर आजार वाढल्यावर उपचारदेखील त्रासदायक होतात.

योग्य वेळी योग्य दिशेने पाऊल उचलणे हे मुलांच्या भावी आयुष्याच्या दृष्टीने हितकारक असते.

२. बुद्धिमत्ता

मुलांच्या शिक्षणाचा संबंध बुद्धिमत्तेशी असतो आणि बुद्धीक्षमता किंवा आकलन क्षमता सर्वांमध्ये वेगवेगळी असते, ही गोष्ट लक्षात घेऊन शिक्षण देणे महत्त्वाचे आहे.

मुलांच्या शारीरिक वाढीचे टप्पे नॉर्मल असल्यास साधारणपणे बुद्धिमत्ता नॉर्मल (साधारण) असते व यात उशीर झाल्यास बुद्धिमत्ता कमी असते, मतिमंदत्व असते.

बुद्धीक्षमता, बुद्धीच्या बऱ्याच व्याख्या करण्यात आल्या आहेत. त्यात सोपी व्याख्या अशी करता येईल की, आपल्या क्षमतेनुसार व्यक्ती आपल्या वातावरणातील घटनांशी कशाप्रकारे समायोजन करू शकते.

बुद्धी मोजण्यासाठी बुद्ध्यांक तपासला जातो.

$$\text{बुद्ध्यांक} = \frac{\text{मानसिक वय}}{\text{शारीरिक वय}} \times १००$$

यासाठी व्हर्बल (Verbal) आणि परफॉर्मन्स टेस्ट (Performance Test) वापरल्या जातात. मात्र त्यामध्ये फक्त भाषा, गणित आणि विज्ञानाशी निगडित गोष्टी तपासल्या जातात. त्यांचा आजच्या

शिक्षणपद्धतीत समावेश आहे.

निसर्गाने ही बुद्धीक्षमता सर्वांमध्ये सारखी ठेवली नाही, तिची वाटणी एखाद्या घंटेप्रमाणे आहे. एका टोकाला मतिमंद मुले असतात तर दुसऱ्या टोकाला Genius मुलांचा समावेश आहे.

बुद्धीमध्ये बराच फरक असतो. जी मुले मतिमंद असतात त्यांचा बुद्ध्यांक ७० पेक्षा कमी असतो. मतिमंद मुलांना सामान्य मुलांच्या बरोबरीने शिकविण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. यासाठी वेगळ्या शाळांचे प्रयोजन करणे आवश्यक आहे.

ज्या मुलांचा बुद्ध्यांक (I.Q.) ७० च्या वर असतो त्यांना साधारण शाळेत शिकविले जाते. या शाळेमध्ये शिकविले जाणारे विषय म्हणजे भाषा, गणित, विज्ञान, इतिहास – भूगोल. बुद्ध्यांक सर्व विद्यार्थ्यांमध्ये सारखा नसून ७० – १२० – १५० च्या दरम्यान असतो. मात्र या विविध बुद्ध्यांकाच्या विद्यार्थ्यांकडून सारख्याच गुणांची अपेक्षा केली जाते. कारण त्यांनी स्पर्धेला तोंड देणे गरजेचे असते.

दहावी इयत्तेपर्यंत हे विषय सारखेच असतात व अकरावी आणि बारावीला विषय निवडतानादेखील जास्ती मान असलेल्या विज्ञान शाखेत नंतर कॉमर्स, आर्टस्‌मध्ये प्रवेश मिळतो.

आपण जसे पाहिले की साधारण बुद्धिमत्ता असलेल्या मुलांची बुद्धीक्षमतादेखील सारखी नसते. मात्र त्यांच्याकडून एकसारखी अपेक्षा केली जाते कारण करिअर निवडण्यासाठी जास्तीत जास्त गुणांची आवश्यकता असते.

यामध्ये जास्त बुद्धिमत्ता असलेल्या विद्यार्थ्यांना जास्त त्रास होत नाही मात्र कमी बुद्ध्यांक असलेल्या विद्यार्थ्यांना जास्त अभ्यास करावा लागतो आणि त्यांना अपेक्षित गुणदेखील प्राप्त होत नाहीत. मग अशा मुलांकडून जास्त गुणांची अपेक्षा ही चुकीची अपेक्षा होणार नाही काय ?

मग अशी मुले सहज कॉपीसारखा मार्ग अवलंबतात. त्यात, त्यांची काय चूक ? मुलात क्षमता कमी आणि अपेक्षा जास्त असे हे गणित आणि जास्त ताण घेऊनही फायदा होत नाही तर कमी ताणाचा मार्ग म्हणजे कॉपी !

मला असे बरेच पालक माहीत आहेत ज्यांची मुले ताणामुळे उदासीनता, चिंताग्रस्तता वगैरे मनोविकारांना बळी पडत आहेत. मग असे पालक त्यांच्या मुलांसाठी सुरक्षित परीक्षा केंद्राची (सेफ सेंटर) निवड करतात. मग त्यात त्यांचे कोठे चुकते ?

पालक मुलांकडून जास्तीची अपेक्षा करतात. मात्र ती अपेक्षा त्यांनी का करू नये, त्यांचे खरेच चुकते काय ?

माझ्या मते, त्यांचे चुकत नाही. कारण त्यांना आपल्या मुलांच्या खऱ्या क्षमतेची कल्पना १०वी – १२वी इयत्तेत जाईपर्यंत येत नाही. कारण या मुलांना क्षमताधिष्ठित शिक्षण दिले जात नाही.

जवळजवळ २०-२५ टक्के मुलांमध्ये वेगवेगळ्या विषयांत अक्षमता असते. उदा. भाषा, गणित आणि इतर विषयांत अपेक्षेप्रमाणे प्रावीण्य मिळविणे त्यांना शक्य नसते. (त्याची कारणे पुढे येतील)

मग अशांसाठी दोनच मार्ग असतात. एक, तणावाला सामोरे जाणे आणि वेगवेगळ्या मानसिक आजारांना बळी पडणे आणि दुसरा, कॉपी करणे. हा मार्ग बऱ्याच जणांना सोपा वाटतो.

या दोन्ही समस्यांपासून त्यांची सुटका करावयाची असेल तर त्यांना ज्या विषयात (डिस्लेक्सिया) अध्ययन अक्षमता आहे त्यासाठी त्यांना ज्या सवलती दिल्या आहेत त्या मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे पास होणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण वाढेल.

मात्र अशा विद्यार्थ्यांना शोधण्यासाठी शाळेत समुपदेशक (Counsellors) आणि मानसोपचारतज्ज्ञाच्या (Psychiatrist)

मार्गदर्शनाची गरज आहे. हे काम बरेच अवघड आहे.

याशिवाय खऱ्या अर्थाने विद्यार्थ्यांमधील वेगवेगळे गुण शोधणे आणि त्याप्रमाणे शिक्षण देणे व अपेक्षा करणे म्हणजेदेखील त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा योग्य विकास होईल. यामुळेच आयुष्यात ते चांगल्या प्रकारे यशस्वी नागरिक होऊ शकतील.

Descriptive Lavels For IQ Score

IQ Score	*Descriptive Lavel*	*Population*
Above 130	Very Superior	2.2%
120 - 130	Superior	6.7%
110 - 119	Bright normal	16.1%
90 - 109	Average	50.0%
80 - 89	Dull normal	16.1%
70 - 79	Borderline	6.7%
Below 70	Mentally Challenged	2.2%

३. बहुविध बुद्धीक्षमता

बहुविध बुद्धीक्षमता अर्थात मल्टिपल इंटेलिजन्स (Multiple Intelligence) होय. जेंडरने (Gender) आठ प्रकारच्या बुद्धीक्षमता सांगितल्या.

१. **Linguistic (भाषेची बुद्धिमत्ता) :**
हिचा संबंध वाचणे, लिहिणे, ऐकणे, बोलणे आणि समजण्याशी निगडित असतो. कविमनाच्या लोकांत ही बुद्धीक्षमता जास्त प्रगल्भ असते.

२. ***Logical Mathematical :***
यामध्ये ॲब्स्ट्रॅक्ट थिंकिंग, रिझनिंग (Abstract Thinking,, Reasoning) याचा संबंध जास्त असतो. ही वैज्ञानिक कामं करण्याशी निगडित आहे.

३. **Spatial :**
हिचा संबंध वैमानिक, नाविक, इंजिनियर, सर्जन, पायलट, ड्रायव्हर, पेंटर यांच्याशी असतो.

४. **Musical** :
याच्यामध्ये गाण्यासाठी लागणारे पीच (Pitch) आणि टोन (Tone)शी निगडित गुण असतात.

५. **Bodily Kinesthetic** :

यात स्नायूंच्या हालचालींची सुसूत्रता चांगली असते. उदा. डान्सिंग, ॲथलेटिक (Dancing, Atheletic) सर्जरी, क्राफ्ट करण्याचे गुण अधिक चांगले असतात.

६. **Interpersonal** :

यामध्ये दुसऱ्याला समजून घेण्याचे गुण असतात. उदा. धार्मिक गुरू, डॉक्टर्स.

७. **Intrapersonal** :

यामध्ये स्वत:ला ओळखण्याचे गुण जास्त असतात.

८. **Naturalistic** :

यामध्ये झाडे, फुले, पाने ओळखण्याची क्षमता जास्त असते आणि नैसर्गिक वस्तूंशी निगडित गुण जास्त असतात.

सर्वांमध्ये कमीअधिक प्रमाणात हे गुण असू शकतात. ज्यांच्यात जे गुण जास्त प्रमाणात आहेत त्यांना त्या क्षेत्रात शिक्षण आणि काम करण्याची संधी मिळाल्यास ते जास्त प्राविण्य प्राप्त करू शकतात.

त्यांना योग्य संधी मिळाली नाही तर आयुष्यभर त्याचे दुष्परिणाम त्यांना भोगावे लागतात.



आइन्स्टाईनच्या मेंदूमध्ये परायटललोब या मेंदूच्या भागाची वाढ

सामान्य लोकांच्या मेंदूपेक्षा जास्त होती. म्हणून त्याच्यात गणिताची आणि स्पेस – अंतराळ समजण्याची क्षमता जास्त होती. त्यामुळे त्याने थिअरी ऑफ रिलेटिव्हिटी (Theory of Relativity) चा सिद्धांत मांडला.

आइन्स्टाईनसारखी सहजता प्रत्येकाला शक्य नाही. कारण त्याच्या मेंदूची वाढ व क्षमता – त्याच्यात लिहिण्या-वाचण्याची क्षमता मात्र कमी होती.

४. मुलांमधील शैक्षणिक समस्या : उपजत की मानवनिर्मित ?

शैक्षणिक समस्यांचा विचार करण्यासाठी आपणास, आपण शिक्षण कोणास आणि कशासाठी देतो हे माहीत असणे आवश्यक आहे.

शिक्षण ज्याला देतो त्याची मानसिक क्षमता माहीत असणे आवश्यक आहे.

सर्वांची क्षमता सारखीच असते, असे आपण गृहीत धरून सर्वांना सारखाच अभ्यासक्रम लागू करतो आणि त्यांना एकाच प्रकारचे शिक्षण देतो, हे चूक आहे.

प्रत्येकाला त्याच्या क्षमतेप्रमाणे शिक्षण देणे आवश्यक आहे.

EDUCATION हा मूळ लॅटिन शब्द आहे. लॅटिनमध्ये 'E' चा अर्थ From Within म्हणजे आतून आणि 'DUCO' चा अर्थ Go Ahead म्हणजे पुढे जाणे म्हणजे व्यक्तीच्या आत असलेल्या क्षमतेला अनुसरून पुढील मार्ग अवलंबिणे हा त्याचा अर्थ आहे. मात्र सहसा असे घडताना आढळून येत नाही.

आपण पाश्चिमात्य लोकांची तत्त्वे आत्मसात केली व त्यांना राबविताना

भारतीय पद्धतीचा अवलंब केला. उदा. K.G. - Kinder Garden मध्ये मुलांसाठी Play Method चा वापर करणे आवश्यक आहे. मात्र आपल्याकडे अशा वर्गांसाठी त्या शाळेमध्ये जागा नसते आणि खेळांचे साहित्यही उपलब्ध नसते. म्हणून एकेका वर्गात (खोलीत) ५०-६० मुले बसवून त्यांना नुसते वाचणे, लिहिणे शिकविले जाते आणि मुलांच्या कोवळ्या मनावर विनाकारण ताण टाकला जातो. त्यांनी खेळणे आवश्यक असते.

माझ्या मते, अशा शाळांची संख्या वाढविण्यापेक्षा त्यांना आपल्या गल्लीत किंवा कॉलनीत, घरात मोकळेपणाने खेळू देणे जास्त योग्य आहे.

वयाच्या सातव्या वर्षापर्यंत त्यांना लिहिण्यासाठी वा वाचण्यासाठी जबरदस्ती करू नये. त्यांना त्यांच्या क्षमतेप्रमाणे लिहिणे व वाचणे जमेल तेवढेच करून घ्यावे.

मुलांची बौद्धिक वाढ जसजशी होते तसतसा त्यांच्या प्रगतीमध्ये बदल घडून येतो.

एखादे काम करण्यासाठी जेव्हा त्यांच्यात प्रवृत्ती निर्माण होते तेव्हा त्यांना ते काम करण्याची संधी दिली पाहिजे, नसता त्यांच्यावर जास्त दडपण येण्याची शक्यता असते.

आजच्या युगात मुलांना अगदी बालवर्गा (K. G.) पासून स्पर्धेला तोंड द्यावे लागते आणि त्यामुळे त्यांना पुढे जास्त त्रास होतो.

मुलांना त्यांच्यामध्ये असलेल्या गुणांची, सुप्त गुणांची वाढ करण्याची संधी मिळत नाही. यामुळे मुले त्यांच्यामध्ये असलेल्या गुणांना योग्य तऱ्हेने वाढवू शकत नाहीत.

उलट मुलांना ज्याची जास्त आवड नाही किंवा जे गुण त्यांच्यात वाढण्याची क्षमता नाही, त्यामध्ये त्यांना प्रशिक्षित केले तर त्यांना त्याचा

फायदा होण्याऐवजी नुकसान होते.

शिक्षणाच्या दृष्टीने बोलणे, वाचणे, ऐकणे आणि लिहिणे हे महत्त्वाचे घटक आहेत.

अभ्यासाच्या दृष्टीने भाषा, विज्ञान, इतिहास, भूगोल आणि गणित हे महत्त्वाचे घटक आहेत.

क्षमतेच्या दृष्टीने काहींमध्ये भाषेत प्रावीण्य मिळविण्याची क्षमता जास्त असते, काहींत विज्ञान, काहींना इतिहास व भूगोल तर काहींत गणिताची. काही मुलांत भाषेत प्रावीण्य मिळविण्याची क्षमता अफाट असते तर गणितात प्रावीण्य मिळविण्याची क्षमता अजिबात नसते.

अशा परिस्थितीत जर या मुलांवर गणिताचा अभ्यास करण्यासाठी जास्त जोर दिला व कधीकाळी त्यांना शिक्षा दिली, तर त्याबद्दल त्यांना तिटकारा निर्माण होतो आणि ज्या वेळेचा वापर त्यांनीभाषा शिकण्यासाठी (चांगल्या प्रकारे) केला असता तो त्यांना करता न आल्यामुळे त्यातही ते चांगले प्रावीण्य मिळवू शकत नाहीत.

या गोष्टींकडे लक्ष देणे आवश्यक आहे. एका रूपकाद्वारे ही गोष्ट समजविण्याचा मी प्रयत्न करतो.

जर एखादी जमीन तांदळाच्या पिकासाठी चांगली आहे आणि आपण तेथे गहू लावला तर तांदूळ तर येणार नाहीच आणि गहूदेखील चांगला येणार नाही आणि अशा प्रकारे दोन्ही पिकांचे नुकसान होईल.

त्याचप्रमाणे व्यक्तीच्या क्षमतेत भिन्नता आहे हे जाणून त्यांच्यातील विकास होऊ शकणाऱ्या गुणांचा विकास केल्यास ते गुण नक्कीच विकसित होतील.

आपली शिक्षण पद्धती परिक्षार्थी निर्माण करते आणि त्यामुळे परिक्षेत कसल्याही प्रकारे उत्तीर्ण होणे हेच विद्यार्थ्यांचे आणि पालकांचे ध्येय असते आणि स्पर्धेमुळे वाटेल त्या मार्गाने जास्त गुण कसे मिळवता

येतील याकडे त्यांचे लक्ष असते.

मात्र मुलांमधील गुणांची योग्य वाढ होईल, त्या गुणांना योग्य चालना मिळेल व त्यात त्यांना नैपुण्य प्राप्त करता येईल याकडे सर्वांचे दुर्लक्ष होते आणि स्पर्धेमुळे वाटेल त्या मार्गाने जास्त गुण कसे मिळवता येतील याकडे त्यांचे लक्ष असते.

प्रचलित रूढीप्रमाणे डॉक्टर किंवा इंजिनियर होण्याकडे व त्यासाठी लागणाऱ्या गुणांसाठी प्रयत्न करण्याकडे जास्त कल असतो.

हुशार मुलांतदेखील एक – दोन गुणांमुळे गुणवत्तेमध्ये फरक पडतो. त्यामुळे हे विद्यार्थीदेखील फक्त परीक्षार्थी बनतात आणि आपल्यातील सुप्त गुणांचा विकास करण्याकडे दुर्लक्ष करतात.

आज वैज्ञानिकदृष्ट्यादेखील हे सिद्ध झाले आहे की, सर्वांची बुद्धिमत्ता ही भिन्न भिन्न असते. मात्र हे मानण्यास नातेवाइक आणि आई–वडील तयार नसतात.

समाजात एका मुलाची दुसऱ्याशी तुलना करण्याचा कल जास्त प्रमाणात आढळून येतो. त्यामुळे गुणात्मकदृष्ट्या कमी असलेल्या मुलांमध्ये नैराश्य, न्यूनगंडत्वाची भावना निर्माण होते. जे जास्त संवेदनाक्षम असतात ते आत्महत्येस बळी पडतात.

किशोरवयीन मुला–मुलींमध्ये विशेषत: हे प्रमाण वाढत आहे. कारण कॉलनीत एखाद्यापेक्षा दुसरा वरचढ निघाला, एखाद्याला वैद्यकीय वा इंजिनियरिंगला प्रवेश मिळाला व दुसऱ्याला नाही मिळाला तर नातेवाईक, शेजारीपाजारी म्हणतात, 'अरे, त्याचा नंबर लागला आणि तुझा नाही लागला. तुझ्यात काय कमी आहे ?'

झाले, त्याच्या भावना दुखावल्या जातात आणि त्याचा कोणी विचार करीत नाही.

माझ्या मते भिन्न क्षमता, भिन्न बुद्धिमत्ता हे वेगवेगळ्या व्यक्तीचे

वैशिष्ट्य आहे. हे समाजाला पूर्णपणे पटलेले नाही. त्यामुळे हे माहीत असूनदेखील कळत – नकळत दुसऱ्याच्या भावना दुखावल्या जातात.

या फरकाबद्दल दुसऱ्या एका रूपकाने जास्त चांगले स्पष्टीकरण करता येईल.

इलेक्ट्रिक बल्बच्या क्षमतेचे उदाहरण घेऊया.

काही बल्ब २० व्होल्ट, काही ४०, ६०, १००, १५०, २००, ५०० व्होल्टचे असतात. विद्युत प्रवाह देणारे पॉवर हाऊस एकच असले तरी, येणारा प्रवाह एकच असला तरी २० व्होल्टचा बल्ब ६० व्होल्टच्या बल्बइतका प्रकाश देऊ शकणार नाही. ६० व्होल्टचा बल्ब १०० व्होल्ट एवढा आणि १०० चा ५०० व्होल्ट एवढा प्रकाश देऊ शकणार नाही. कारण त्यांची मूळ क्षमताच तेवढी नाही.

जर विद्युतप्रवाह वाढविला तर बल्ब शॉट होतो. त्याप्रमाणे बुद्धीचे आहे. क्षमतेपेक्षा जास्त अपेक्षा, जास्त ताण असल्यास बुद्धी शॉट होते. म्हणजे वेगवेगळे मनोविकार आणि प्रसंगी आत्महत्यादेखील.

त्यामुळे मुलांकडून अपेक्षा करताना त्यांच्या क्षमतेचा पूर्णपणे व सर्व बाजूंनी योग्य विचार करून योग्य प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.

प्रशिक्षण हे जास्त महत्त्वाचे आहे. प्रशिक्षणात त्याच्या क्षमतेनुसार वैयक्तिक लक्ष दिले जाते आणि क्षमता असल्यास त्यात तो नैपुण्य मिळवतो.

ज्याप्रमाणे एखाद्या ड्रायव्हरला गाडी चालविण्यासाठी त्याच्या क्षमतेनुसार वेळ दिला जातो जेणेकरून तो गाडी चांगल्या प्रकारे चालवू शकेल. त्याप्रमाणेच विद्यार्थ्याला त्यांच्या विशिष्ट कलानुसार वेळ देऊन प्रशिक्षित करण्याकडे लक्ष पुरविणे आवश्यक आहे. त्या प्रशिक्षणाचा त्याला त्याच्या आयुष्यात योग्य उपयोग होऊ शकतो.

त्यामुळे शिक्षण हे परीक्षाभिमुख न होता प्रशिक्षणाभिमुख होणे आवश्यक आहे. त्यातून बऱ्याच समस्या सुटतील.

५. अध्ययन अक्षमता (डिस्लेक्सिया)
Dyslexia

'लपलेले अपंगत्व' न दिसणारे अपंगत्व ?

हे जुन्या काळापासून लोकांना माहीत आहे. जसजसे शिक्षणाचे महत्त्व लक्षात येऊ लागले व शिक्षणावर जसजसा जोर दिला जाऊ लागला तसतसे या अपंगत्वाचे महत्त्व अधिक समजू लागले. या प्रकारच्या अपंगत्वाची झळ हुशार विद्यार्थ्यांनादेखील बसते.

हे अपंगत्व लहान वयातच ओळखणे व त्यावर योग्य उपाययोजना करणे आवश्यक आहे. पाश्चिमात्य देशांतील ८–१०% मुलांमध्ये या समस्येचे प्रमाण आढळून येते. भारतामध्ये अशा प्रकारचे सर्वेक्षण झालेले नसल्यामुळे अशा प्रकारची आकडेवारी उपलब्ध नाही.

याला अध्ययनातील अपंगत्व (लर्निंग डिसएबिलिटी) म्हणून ओळखले जाते. हे वेगवेगळ्या प्रकारे आणि वेगवेगळ्या प्रमाणात मुलांमध्ये आढळून येते. यात वाचण्यात, लिहिण्यात वा गणितात वेळोवेळी असमर्थता आढळून येते.

या मुलांमध्ये वेगवेगळी लक्षणे उदा. एकाच गोष्टीवर जास्त वेळ लक्ष केंद्रित करू न शकणे, लवकर विसरणे, दिलेल्या सूचना न पाळणे,

दोन अक्षरांमध्ये फरक न करू शकणे, वाचण्यात चुका खूप करणे, नीट क्रमवार गोष्टी न सांगू शकणे वगैरे लक्षणे आढळून येतात.

१) प्रत्येक दिवशी वेगळे वागणे.

२) बेचैन असणे.

३) एखाद्या गोष्टीत जास्त वेळ लक्ष न देऊ शकणे.

४) सहजपणे लक्ष विचलित होणे

५) जे म्हणायचे, सांगायचे असते ते सोडून दुसरेच सांगणे.

६) शिस्त लावणे अवघड असणे.

७) बदलाशी ॲडजस्ट (समायोजन) करू न शकणे.

८) पूर्णपणे एखादी गोष्ट नीट लक्ष देऊन ऐकू न शकणे

९) लवकर विसरणे

१०) उजवे आणि डावे ओळखण्यात त्रास होणे

११) एकसारख्या गोष्टी वा लोकांची नावे सांगण्यास त्रास होणे

१२) अक्षर चांगले नसणे

१३) शब्द उलटे लिहिणे

१४) आकलनक्षमता कमी असणे.

रीडिंग डिसऑर्डर :

रीडिंग डिसऑर्डर असलेली मुले साधारणपणे हुशार असतात. या मुलांमध्ये वाचण्याची, लिहिण्याची आणि गणिताची क्षमता कमी असते.

ही उणीव संवेदनेतील अथवा स्नायूतील बिघाडामुळे नसते किंवा त्यांना कुठलाही मानसिक आजार नसतो.

साधारणपणे वयाच्या पाचव्या वर्षी हा बिघाड लक्षात येऊ शकतो. वाचण्यातील अडचणींमुळे लिखाणातदेखील अडचण येऊ शकते.

१) हळू वाचणे

२) अडखळत वाचणे

३) जास्त वेळ न वाचू शकणे

४) वाचण्याचा कंटाळा करणे

५) बरेच जण एक एक शब्द वेगवेगळा वाचतात आणि बऱ्याच जणांना प्रत्येक शब्द वाचण्यासाठी बराच त्रास होतो.

६) अर्धविराम, पूर्णविरामांकडे लक्ष देत नाहीत.

७) शब्द उलटे वाचणे उदा.

वाडा – डावा

नको – कोन

८) बरेच शब्द अंदाजाने वाचतात. उदा. 'अ' अक्षरापासून सुरू होणारा 'शब्द' असल्यास 'अ' हे अक्षर न वाचता दुसरे अक्षर वाचतात किंवा 'अ' अक्षराने सुरू होणारा दुसरा कुठलाही शब्द वाचतात.

९) बऱ्याच वेळा शब्द गाळतात. शब्द बदलवून टाकतात किंवा नवीन शब्दप्रयोग करतात. त्यामुळे चूक गोष्टी लक्षात ठेवतात आणि त्याचा लिहिण्यावरदेखील परिणाम होतो.

लिहिण्यातील बिघाड :

लिहिण्यातील दोष साधारणपणे पहिल्या आणि दुसऱ्या वर्गात लक्षात येतो. साधारणपणे खालील अडचणी आढळून येतात :

१) शक्य तेव्हा लिहिणे टाळतो.

२) लिखाण फारच हळू असते.

३) पेन नीट धरू शकत नाही.

४) अक्षर सुवाच्य नसते – शुद्धलेखनाच्या चुका फार होतात. दोन शब्दांमध्ये योग्य अंतर सोडत नाही. अर्धविराम, स्वल्पविराम, पूर्णविराम देणे टाळतात.

५)	बऱ्याच वेळा शब्द उलटे व अक्षर उलटे लिहितात.

६)	बऱ्याच वेळा शब्द गाळले जातात. अर्धवट शब्द अथवा एखादे अक्षर वगळून वा वाढवून शब्द लिहितात.

उदा. वाचणे - 'वाणे' वा 'वाचवणे'

७)	अक्षर सुवाच्य नसल्यामुळे वाचणे कठीण होते.

गणितातील अडचणी :

गणितातील अडचणी साधारणपणे तिसऱ्या आणि चौथ्या इयत्तेत लक्षात येतात. साधारणपणे आढळून येणाऱ्या अडचणी :

१)	साधारणपणे बेरीज, वजाबाकी, गुणाकार 'एक' या संख्येने करताना चुका होतात.

उदा.	१ + १ = १

३ + ० = ०

५ x ० = ५

१२ + ९ = १६

२)	सारखे आकडे आल्यासही किंवा एकानंतर दुसरा आकडा आल्यास चूक होते.

उदा.	३ - ३ = ३

५ + ४ = ८

८ + ९ = १६

३)	एकम, दहम आणि शतम जागेवर आकडा ठेवून गणित करण्यात चूक होते.

४)	मोठ्या आकड्यातून लहान आकडा वजा करण्यात चुका होतात.

५)	गणित न समजताच करण्याकडे कल.

उदा. माझ्याकडे २४ आंबे आहेत. त्यांना चार मुलांमध्ये सारख्या

प्रमाणात वाटल्यास प्रत्येकाला किती आंबे येतील.

उत्तर : २०

६)	साधारणपणे बऱ्याच मुलांमध्ये ज्याच्यात लिहिण्यात आणि वाचण्यात समस्या आहेत त्यांच्या गणितामध्येदेखील समस्या आढळून येतात.

७)	आकडा उलटा लिहिणे - ३ चा ६

८)	आकड्यातील १६ चा ६१

९)	१००८ ला एक, शून्य, शून्य आठ वाचणे

या मुलांना विशेष प्रशिक्षण देणे गरजेचे आहे.

साधारण आणि अध्ययन अक्षमता असलेल्या मुलाचे मेंदू



नॉर्मल	डिस्लेक्सिया

अध्ययन अक्षमता असलेल्या मुलांच्या मेंदूच्या विशिष्ट भागाचे कार्य हे नॉर्मल मुलांच्या मेंदूच्या कार्यापेक्षा कमी असते. यामध्ये ब्रोकाज

एरिया, वर्निकेज एरिया, अँग्युलर गायरसचा समावेश आहे. डिस्लेक्सिया असलेल्या मुलांमध्ये ब्रोकाज एरियाचा जास्त वापर होतो.

लिहिण्या - वाचण्याच्या क्षमतेशी निगडित मेंदूचे भाग



६. लिहिण्या-वाचण्याची अक्षमता का निर्माण होते ?

आवश्यक ती ट्रेनिंग देऊनदेखील बरीच मुले अशी असतात की, ज्यांच्यामध्ये लिहिण्या-वाचण्याची क्षमता कमी असते. हे असे का होते हे समजण्यासाठी लिहिण्या आणि वाचण्यामध्ये आवश्यक असलेल्या शारीरिक प्रक्रियेबद्दल जाणून घेणे आवश्यक आहे. जेव्हा व्यक्ती एखादी वस्तू पाहते तेव्हा त्यापासून निघणाऱ्या संवेदना या डोळ्यांतील रेटिनाच्या माध्यमातून मेंदूच्या मागील भागात असलेल्या ऑक्सिपीटल लोबपर्यंत पोहोचतात.

१) ऑक्सिपीटल लोबमध्ये व्हिज्युअल कार्टिक्स असते. डोळ्यांनी पाहिलेल्या वस्तूंचे संदेश पोहोचतात तेथे व्हिज्युअल असोसिएशन एरिया असतो.

२) व्हिज्युअल असोसिएशन एरिया हा भाग वाचण्याच्या माध्यमातून आलेले संदेश वर्णिकिच्या एरियात पाठवितो.

३) वर्णिकेचा एरिया हा भाषा समजण्याचे कार्य करतो व वाचण्याच्या माध्यमातून आलेल्या संदेशाचा अर्थ व्हिज्युअल असोसिएशन एरियामध्ये लावला जातो.

४) जर व्हिज्युअल असोसिएशन नसेल तर व्यक्ती भाषा ऐकण्याच्या माध्यमातून समजू शकते. लिहिण्याच्या वा वाचण्याच्या माध्यमातून नव्हे.



मेंदूची विभागणी दोन भागांत झालेली आहे उजवा आणि डावा. उजव्या मस्तिष्काचे कार्य कला, संगीत, कल्पनाशक्ती आणि न बोलता होणाऱ्या कार्याशी संबंधित असते. डावे मस्तिष्क विवेक, लॉजिकल ॲनॅलिसिस आणि गणितासाठी व बोलण्यासाठी लागणाऱ्या कौशल्याशी निगडित आहे.

डावे मस्तिष्क हे ऐकण्या व वाचण्याच्या माध्यमातून बोलण्याच्या आणि लिहिण्याच्या क्रियेशी निगडित आहे. या भागाच्या वाढीमध्ये काही कमतरता असल्यास ही कमतरता लिहिण्या आणि वाचण्याच्या माध्यमातून स्पष्ट होते. लिहिण्या-वाचण्यातील अक्षमता ही मेंदूच्या या विशिष्ट भागाची योग्य ती वाढ होण्यास उशीर झाल्यामुळे प्रकट होते. मेंदूमध्ये कुठल्याही प्रकारची इजा नसते, परंतु मेंदूच्या गुंतागुंतीच्या रचनेमध्ये बदल आढळून येतो. लिहिण्या - वाचण्याच्या अक्षमता असलेल्या मुलांच्या मेंदूमध्ये नॉर्मल मुलांच्या मेंदूपेक्षा वेगळी रचना असते. हा फरक भाषेशी निगडित भागामध्ये अथवा दोन मेंदूंना जोडणाऱ्या पुलात अथवा ऐकण्याशी आणि

पाहण्याशी निगडित मेंदूतून जाणाऱ्या मार्गामध्ये असतो. बोलण्याची प्रक्रिया ही मेंदूच्या विशिष्ट भागामध्ये काय पाहिले आणि काय ऐकले यांचा कशाप्रकारे अर्थ लावला जातो यावर अवलंबून असते. मेंदूच्या रचनेतील फरक हा कार्यातील फरक दर्शवितो आणि पर्यायाने भाषेतील बदल दर्शवितो. अशा प्रकारचे कार्यातील बदल हे मुलांच्या लिहिण्या आणि वाचण्यामधील अक्षमतेला जबाबदार असतात.



व्हिज्युअल कार्टेक्स दृष्टीचे विश्लेषण

भाषेच्या एरियामधील संदेशामध्ये बिघाड

लिहिताना वा काम करताना साधारणपणे ५ टक्के मुले डाव्या हाताचा वापर करतात. लिहिताना त्यांना उजव्या हाताने लिहिण्यासाठी बऱ्याच वेळा दडपण आणले जाते ते योग्य नाही.

कारण जी मुले डाव्या हाताने लिहितात त्यांच्या मेंदूच्या उजव्या भागात लिहिण्याच्या केंद्राचा ताबा असतो. म्हणून ते डाव्या हाताने लिहितात. साधारणपणे ९५% लोकांत हे केंद्र मेंदूच्या डाव्या भागात असते. त्यामुळे ९५% मुले उजव्या हाताने लिहू शकतात व त्यांच्यात लिहिण्याची समस्या कमी असते.

डाव्या हाताने लिहिणाऱ्यांमध्ये लिहिण्याच्या समस्येचे प्रमाण जास्त आहे. म्हणून त्यांच्याकडे विशेष लक्ष देण्याची गरज असते.

७. उपचारात्मक उपाय (रिमेडिएशन)

लिहिता वाचता न येण्याच्या उपचार पद्धतीमध्ये 'रिमेडिएशन' आवश्यक असते. यामध्ये मुलांच्या उपजत असलेल्या शैक्षणिक क्षमता जास्त दृढ करण्याकडे लक्ष दिले जाते. ज्या उपजत अक्षमता आहेत त्याची उणीव भरून काढण्यासाठी उपजत क्षमता अधिक दृढ केल्या जातात आणि अभ्यासक्रम बऱ्याच अंशी समजण्यास मदत केली जाते.

प्रत्येक मुलामध्ये ज्या उपजत अक्षमता आहेत, त्या शोधून त्यासाठी त्यांच्या क्षमतेप्रमाणे प्रत्येक मुलासाठी विशिष्ट उपचारपद्धती आखली जाते. वाचणे ही एक गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. वाचण्याची प्रक्रिया ही लिहिण्याच्या प्रक्रियेच्या अगदी विरुद्ध आहे. वाचण्यामध्ये छापील अक्षरे ही त्यांच्या उच्चारामध्ये बदलली जातात आणि लिहिण्यामध्ये हे उच्चार लिखित अक्षरांमध्ये बदलले जातात. साधारणपणे मुले ही प्रक्रिया थोड्याशा मार्गदर्शनाने सहजपणे अवगत करतात, परंतु शैक्षणिक अक्षमता असलेल्या मुलांसाठी शिक्षकांनी विशेष प्रयत्न करणे आवश्यक असते. वाचण्यासाठी मुलांना मुळाक्षरांचे ज्ञान अवगत असणे आवश्यक असते. तसेच त्या मुळाक्षरांचा उच्चार आणि

मुळाक्षरे जोडून शब्द तयार करण्याची प्रक्रिया अवगत होणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे जोडाक्षर शब्दाचा अर्थ आणि वाक्यरचनासुद्धा समजणे आवश्यक आहे. वाचण्यामध्ये दोन प्रक्रिया होतात :

१) लिहिलेल्या अक्षरांचे डिकोडिंग.

२) लिहिलेल्या अक्षरांचा अर्थ समजणे.

बऱ्याच मुलांमध्ये या दोन्ही प्रक्रियांपैकी एकामध्ये किंवा दोन्हीमध्ये अडचण असते. ज्या मुलांत वाचलेले अक्षर डिकोड करण्यात अडचण असते, अशी मुले उच्चारलेला शब्द ऐकून डिकोड करू शकतात. म्हणून अशा मुलांना वाचून दाखविल्यास ते अक्षर किंवा वाक्य समजते. बऱ्याच वेळेस पालक तक्रार करतात की मुलाला गोष्ट ऐकायला आवडते मात्र तो स्वत: वाचत नाही. त्याला ती वाचून दाखवावी लागते. वाचणे शिकविण्यामध्ये विशिष्ट गोष्टींचा विचार करणे आवश्यक आहे. जसं, मुलांचे वय, त्यांची कार्यक्षमता. अध्ययन अक्षमता असलेल्या मुलांमध्ये डिकोडिंग आणि कॉम्प्रिहेन्शन समजण्याच्या प्रक्रियेला उत्तेजित करणे किंवा त्याला पूरक पद्धत वापरणे आवश्यक असते.

१. मार्गदर्शक तत्त्वे

१) अध्ययन अक्षमतेचे निदान करताना त्यांच्या अक्षमतेची तीव्रता लक्षात घेणे आवश्यक आहे.

२) ही अक्षमता डिकोडिंग करण्याच्या प्रक्रियेमुळे निर्माण होते. उच्चार ऐकून शब्द किंवा अक्षर समजणे जितके अवघड तितकी ही अक्षमता जास्त. जितका अवघड शब्द तितकी वाचण्याच्या अक्षमतेची तीव्रता जास्त असते.

३) वाचण्याची प्रक्रिया शिकवताना अशा मुलांना साधे शब्द शिकवणे गरजेचे असते. यामध्ये मुलांनी स्वत:हून वाचण्याची प्रक्रिया

काही काळ टाळणेदेखील गरजेचे असते. काही काळ त्यांना तोंडी वाचून किंवा समजावून सांगणे व त्यांना ते उच्चारायला लावणे आवश्यक आहे.

४) एकाच वेळी वेगवेगळ्या Senation संवेदन क्षमतांचा वापर करणे जसे ऐकणे, पाहणे, लिहिणे एकाच वेळी करणे.

२. की-वर्ड ॲप्रोच

यामध्ये मुलांना धड्यामधील मुख्य शब्द वाचून त्यावर लक्ष केंद्रित करण्यास शिकविले जाते. उदा. कुत्रा या मथळ्याखाली असलेल्या धड्यामध्ये पाळीव, पाय, शेपूट, मित्र, प्रामाणिक वगैरे शब्दांवर भर दिला जातो आणि गोष्ट समजण्यास सोपी जाते.

३. वर्ड ॲटेक स्कील : यामध्ये मुलांची वाचण्याची क्षमता वाढवली जाऊ शकते.

४. बेसिक व्होकॅबलरी : यामध्ये असे शब्द शिकविले जातात जे वाक्यामध्ये वारंवार येतात आणि जे दृष्टीत पक्के बसतात. उदा. होय, नाही, मी, तू, ते, आम्ही इ. साधारणतः अशा प्रकारचे २०% शब्द कुठल्याही पाठ्यपुस्तकात आढळून येतात.

५. फोनिक मेथड : याचा वापर ज्यांच्यामध्ये उच्चार आणि शब्दांचा संबंध समजण्याच्या प्रक्रियेमध्ये बिघाड आहे तेथे उपयुक्त ठरतो. गरज पडल्यास कॅसेटस्‌चा वापर करावा म्हणजे जे दृष्टीने वाचतो तेच ऐकले पाहिजे.

६. सिलॅबिकेशन : यामध्ये मुलांना शब्दाची फोड करून उच्चार करण्यास शिकविले जाते.

वाढत्या तंत्रज्ञानामुळे मुलांना आवश्यकता पडल्यास कॅल्क्युलेटर आणि कॉम्प्युटरचादेखील उपयोग करू दिला पाहिजे. कारण बऱ्याच मुलांत याची क्षमता आणि आवड असते.

८. अभ्यासाचे कौशल्य

शिकण्याच्या आयोजनामध्ये पद्धत, तत्त्वे, नियम आणि ट्रेनिंग पद्धत आणि प्रश्न सोडवण्यासाठी लागणाऱ्या कौशल्याचा समावेश होतो. शिकण्याच्या आयोजनामध्ये विद्यार्थ्याला अभ्यासक्रमाच्या पूर्ततेसाठी तडजोड करता येते. प्रामुख्याने विद्यार्थ्याला कसे शिकवावे आणि त्याच्या ज्ञानाचा वापर कसा करावा हे शिकवण्यावर भर दिला जातो. या कौशल्याचा उपयोग नवीन माहिती कशी मिळवावी, ती कशी लक्षात ठेवावी आणि तिचा वापर योग्य ठिकाणी कसा करावा, हे लक्षात आणून दिले जाते.

शिकण्याच्या कौशल्याचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करता येईल:

१) प्रिपरेटरी स्टडी स्कील : मध्ये वेळेचे आयोजन आणि स्वतःचे आयोजन कसे करावे यावर भर दिला जातो.

२) ॲक्विजेशन स्टडी स्कील : या कौशल्यात, लिहिलेली किंवा ऐकलेली माहिती कशी गोळा करावी आणि तिची योग्य ती रचना कशी करावी यावर भर दिला जातो.

३) एक्सप्रेशन स्टडी स्कील : यामध्ये चाचण्यांमध्ये आणि परीक्षेमध्ये ज्ञान कसे प्रकट करावे हे शिकवले जाते. यामध्ये तोंडी आणि लेखी पद्धतीवर भर दिला जातो.

विद्यार्थ्याला वेगवेगळ्या पद्धतीतून माहिती कशी मिळवावी आणि ती कशी प्रकट करावी, यासाठी वेगवेगळ्या पद्धतीचा वापर शिकविला जातो.

४) स्क्रिमिंग : यामध्ये मुलांना महत्त्वाचे वाक्य, शब्द आणि वाक्प्रचार कसे शोधावे हे शिकविले जाते.

यामध्ये खालील पद्धत वापरली जाते :

१) शीर्षक आणि ठळक अक्षरांतील वाक्य वाचणे.

२) प्रस्तावना वाचणे

३) प्रत्येक परिच्छेदाचे पहिले वाक्य वाचणे

४) चित्र अथवा आकृत्यांवरील मथळा वाचणे

५) निष्कर्ष आणि सारांश वाचणे

शाळेतून सहकार्य :

अध्ययन अक्षमता असलेला मुलगा जेव्हा शाळेत जातो आणि त्याला लिहिण्या - वाचण्यात अडचण येते, तेव्हा साधारणपणे शिक्षक रागावतात किंवा शिक्षा देतात. बऱ्याच वेळा त्याला बुद्धू म्हणूनदेखील संबोधले जाते. इतर वर्गमित्र त्याची चेष्टा करतात. अशा परिस्थितीमध्ये त्या मुलाला प्रश्न पडलेला असतो की, मी इतर मुलांप्रमाणे गुण का मिळवू शकत नाही ? आणि तो शाळेत जाणे नाकारू लागतो किंवा झालेला अपमान गिळून गप्प बसतो. शिक्षकांना जर या अक्षमतेची योग्य माहिती असेल तर अशा मुलांना लिहिता, वाचता न येण्याचे कारण शोधू शकतात. आणि त्यावर योग्य त्या उपचारपद्धतीचा वापर करू शकतात.

अध्ययन अक्षमता असलेली मुले त्यांना शिक्षकांकडून व पालकांकडून योग्य ते प्रोत्साहन मिळाले नाही तर आपला अभ्यासक्रम योग्यप्रकारे पूर्ण करू शकत नाहीत. शाळा सोडण्याकडे कल वाढतो. अध्ययन अक्षमता

असलेल्या मुलांचे प्रमाण साधारणपणे २० ते २५ टक्के असल्यामुळे अशा मुलांसाठी वर्गात किंवा शाळेत प्रशिक्षण देण्याची निकडीची गरज आहे. वर्गामध्ये किंवा शाळेमध्ये त्यांच्याकडे दुर्लक्ष होणार नाही किंवा त्यांची चेष्टा होणार नाही, याकडे लक्ष पुरविणे आवश्यक आहे.

९. मुलांमधील आत्मविश्वास वाढविण्याची गरज

जर मुलांमध्ये आत्मविश्वास असेल तर त्यांच्यामधील सुप्त गुणांना योग्य तो वाव मिळू शकतो आणि त्या सुप्त गुणांचा मुले वापर करू शकतात. प्रत्येक मुलामध्ये अशा प्रकारचे बरेच सुप्त गुण असतात, ज्यांचा अभ्यासक्रमामध्ये समावेश नाही. त्यामुळे अशा सुप्त गुणांना प्रोत्साहन देणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

साधारणपणे मुले आपल्या बरोबरीच्या दुसऱ्या मुलांशी तुलना करतात आणि त्यांच्या असे लक्षात येते की, आपल्याला ज्या समस्येला तोंड द्यावे लागत आहे ते साधारण मुलांना द्यावे लागत नाही. जर मुलांना वर्गात आणि शाळेत योग्य प्रोत्साहन मिळाले तर, अशा समस्यांनाही चांगल्या प्रकारे तोंड देऊ शकतात. नसता त्यांच्यामध्ये न्यूनगंडाची भावना निर्माण होते आणि आपल्या पुढील आयुष्यातील अपयशाला ती कारणीभूत ठरू शकते. आत्मविश्वासाने वाढलेली मुले जीवनात यशस्वी होतात. त्यांच्यामध्ये जी अक्षमता आहे, तिच्यावर ते मात करू शकतात.

शिक्षकांनी अशा विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे आणि त्यांना न्यूनगंडापासून मुक्त करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

१०. अध्ययन अक्षमतेचा इतिहास

अध्ययन अक्षमतेच्या इतिहासाकडे पाहिले तर असे आढळून येते की, हा इतिहास जवळजवळ दीड शतकांचा आहे. डॉ. कुस्माल यांनी १८७८ मध्ये अध्ययन अक्षमता असलेल्या व्यक्तीला 'रीडिंग ब्लाइंडनेस' या नावाने संबोधले आहे.

१८८७ मध्ये डॉ. बर्लिनने त्याला 'डिस्लेशिया' हे नाव दिले. डिस्लेशिया म्हणजे, शब्दाच्या बाबत अडचण.

१८८८ मध्ये डॉ. पिंगले मॉर्गन यांनी चौदा वर्षांच्या मुलामध्ये ही अडचण ओळखली. त्याच्या शिक्षकाने लिहिले होते, जर या मुलाला सर्व सूचना तोंडी दिल्या तर तो वर्गातील सर्वात हुशार विद्यार्थी ठरतो.

१९२५ मध्ये डॉ. सॅम्युअल यांनी यामध्ये मेंदूच्या वाढीशी निगडित समस्या मांडल्या व बऱ्याच शिकवण्याच्या पद्धतींचा शोध लावला. ज्यांचा वापर आजही होत आहे. यामध्ये महत्त्वाचा टप्पा १९७७ मध्ये नोंदविला गेला. जेव्हा अमेरिकेमध्ये विशेष व्यवस्था करण्यात आली.

१९८१ मध्ये इंग्लंड आणि स्कॉटलंडमध्ये अशा मुलांसाठी विशिष्ट व्यवस्था पद्धती अवलंबण्यासाठी विशेष कायदा करण्यात आला.

१९९५ मध्ये भारतामध्ये 'पर्सन विथ डिसएबिलिटी ॲक्ट' अमलात आला. मात्र यामध्ये अध्ययन अक्षमता असलेल्या मुलांचा समावेश नाही.

अध्ययन अक्षमता असलेल्या लोकांमध्ये बऱ्याच महान लोकांचा समावेश आहे. लिओ- नार्दो द व्हिन्सी, थॉमस एडिसन, आल्बर्ट आइन्स्टाईन, वुड्रो विल्सन, विन्स्टन चर्चिल इ.

अध्ययन अक्षमता असलेल्या मुलांनी गांगरून न जाता समस्येला धैर्याने तोंड देऊन वरील महापुरुषांचा आदर्श आपल्यासमोर ठेवावा आणि तोंड देण्यास शिकावे. १९९६ मध्ये महाराष्ट्र शासनाने यासाठी सवलतीचा कायदा केला.

अध्ययन अक्षमता असलेल्या इ. १२वी पर्यंतच्या
शालेय विद्यार्थ्यांना द्यावयाच्या सवलती

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण विभाग
शासन निर्णय क्र. एसएसर्स १०९९/(१५१/९९) उमाशि-२
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई. ४०० ०३२.
दिनांक २८ नोव्हेंबर २०००

वाचा : १) महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांचे क्र. मराशैसंत्रय/अविवि/९६-९७/३३३४, दि. ३० जुलै, १९९६ चे परिपत्रक.

२) अपंग विद्यार्थ्यांसाठी विषय योजना, परीक्षा योजना, परीक्षा योजना व अभ्यासक्रम पुस्तिका नोव्हेंबर, १९९६

३) शासन निर्णय क्र. एसएससी १०९८/५७८७/ (३१८/९८) उमाशी - २, दि. ८ जुलै, १९९९

शासन निर्णय : इयत्ता १२ वी पर्यंतच्या अध्ययन अक्षमता असलेल्या विद्यार्थ्यांमध्ये डिस्लेक्सिया, डिसग्राफिया आणि डिसकॅल्कुलिया या प्रकारांतील विद्यार्थ्यांचा समावेश आहे. अध्ययन अक्षमता असलेल्या शालेय विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिक्षण सवलतींचे एकत्रीकरण करून एक सर्वसमायोजन शासन निर्णय निर्गमित करण्याचा शासनाचा विचार होता त्यानुसार या शासन निर्णयान्वये अध्ययन अक्षमता असलेल्या शालेय विद्यार्थ्यांना पुढीलप्रमाणे शैक्षणिक सवलती देण्यात येत आहेत.

१) अध्ययन अक्षमता असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी इयत्ता १ ली ते इयत्ता ९ वी आणि इयत्ता ११ वी साठी घेण्यात येणाऱ्या लेखी परीक्षेबरोबरच तोंडी परीक्षा संबंधित विषय शिक्षकांनी घटक चाचण्या व सत्र परीक्षांचे वेळी घेण्यात यावी. या गुणांची नोंद ठेवून वर्षाची सरासरी काढावी. या प्राप्त गुणांच्या आधारे वर्गउन्नती निश्चित करावी.

२) अध्ययन अक्षमता असलेल्या इयत्ता १ ली ते १२ वी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना लेखी परीक्षेच्या वेळी लेखनिक घेण्याची परवानगी देण्यात येत आहे. तसेच त्यांना प्रत्येक परीक्षेसाठी निर्धारित वेळेच्या अर्धा तास (३० मिनिटे) जादा वेळ देण्यात यावा.

३) अध्ययन अक्षमता असलेल्या विद्यार्थ्यांना इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी च्या परीक्षांचे परीक्षा केंद्र त्यांच्या घराजवळ घेता येईल.

४) या विद्यार्थ्यांना लेखी परीक्षेत आकृत्या, नकाशे, आलेख काढण्यापासून सूट देण्यात आली असून सदर प्रश्नांचे / उपप्रश्नांचे (भूमिती, विज्ञान व भूगोल विषयातील) गुण त्यांना रूपांतरित करून देण्यात येतील.

५) या विद्यार्थ्यांना कार्यानुभव, समाजसेवा, तंत्र विषय सारख्या प्रात्यक्षिके कराव्या लागणाऱ्या विषयांच्या शिकण्यासाठी, त्यांच्याकरिता

असलेल्या संबंधित, अधिकृत संस्थेची प्रात्यक्षिके पूर्ण केल्याबाबतची प्रमाणपत्रे सादर करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

६) फक्त अध्ययन अक्षमता असलेल्या अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना उत्तीर्ण होण्यासाठी कमीत कमी २० इतके सवलतीचे गुण देण्यात यावेत. हे गुण एकाच विषयात वा जास्त विषयांत देण्यात यावेत.

७) डिस्लेक्सिया व डिसग्राफिया हे वैगुण्य असलेल्या विद्यार्थ्यांना तीन भाषा विषयांपैकी फक्त दोन भाषा विषय व तिसऱ्या भाषेऐवजी कार्यानुभवांतर्गत असलेल्या विषयांपैकी कोणताही एक विषय घेण्याची परवानगी देण्यात येत आहे.

८) डिस्कॅल्कुलिया हे वैगुण्य असलेल्या विद्यार्थ्यांना बीजगणित व भूमिती या विषयांऐवजी इयत्ता १० वीसाठी, इयत्ता ७ वीचे अंकगणित (७५ गुण) व ७५ गुणांचा कार्यानुभवांतर्गत विषय अशी एकूण १५० गुणांची परीक्षा देण्याची परवानगी देण्यात येत आहे.

९) अध्ययन अक्षमता असलेल्या विद्यार्थ्यांना स्पेलिंगच्या व गणितातील आकडेमोडीच्या (आकडे उलटसुलट लिहिणे) चुकांमध्ये सवलत देण्यात येत आहे.

प्रस्तुत प्रकरणी विभागीय शिक्षण उपसंचालकांनी संबंधित विद्यार्थ्यांच्या अध्ययन अक्षमतेबाबत योग्य त्या वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या प्रमाणपत्रानुसार विद्यार्थी अध्ययन अक्षमतेच्या संवर्गात असल्याचे प्रमाणित करावे. तसेच या सवलतींबाबत शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक) यांनी त्यांच्या क्षेत्रातील शाळांच्या मुख्याध्यापकांना तपशीलवार सूचना द्याव्यात व या वर्गातील पात्र विद्यार्थी शासनाने मान्य केलेल्या सवलतीपासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी.

इयत्ता १० वी, इयत्ता १२ वी परीक्षेच्या वेळी या सवलतींबाबत संबंधित विभागीय मंडळांकडून सर्व संबंधितांना योग्य त्या सूचना दिल्या

जातील व पात्र विद्यार्थ्यांना शासनमान्य सवलती देण्यात आल्याची खात्री विभागीय मंडळ करून घेईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या नावाने व आदेशानुसार

(शं. य. सोनवणे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, शिवाजीनगर, पुणे
सर्व शिक्षण उपसंचालक
सर्व विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची विभागीय मंडळे,
सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक)

२००६ माननीय उच्च न्यायालयाने अध्ययन अक्षमता असलेल्या विद्यार्थ्यांकडे विशेष लक्ष देण्याचे व सवलती देण्याचे आदेश काढले आहेत.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
औरंगाबाद विभागीय मंडळ, औरंगाबाद

परिपत्रक — जा.क्र. औविमं/माविअ/४४२४
महत्वाचे — दिनांक : २५.०९.२००६

प्रति,
सर्व मान्यताप्राप्त माध्य. शाळा,

मुख्याध्यापक,

औरंगाबाद विभाग.

विषय : अध्ययन अक्षमता (डिस्लेक्सिया, डिसग्राफिया, डिसकॅलक्युलिया) असलेल्या इ. १ली ते इ. १२वी च्या विद्यार्थ्यांना विशेष सवलती देण्याबाबत...

संदर्भ : राज्य मंडळ पत्र क्र. रा. म. परीक्षा - ५/८०७४, दिनांक २२.०९.२००६.

उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये मंडळ नियमावलीतील तरतुदीनुसार अंध, मूक-बदीर, अस्थिव्यंग, बहुविकलांग, अध्ययन अक्षमता असलेले इ. १०वी व इ. १२वी या परीक्षांना प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांना विविध सवलती दिल्या जातात. (उदा. अधिक वेळेची सवलत, लेखनिक, घराजवळील परीक्षा केंद्र, टंकलेखन यंत्र वापरण्याची सवलत, मूल्यांकन कार्यपद्धती व गुणांची सवलत इ.)

शासनाने दिनांक ०७ सप्टेंबर, २००६ च्या निर्णयान्वये इ. १ली ते इ. १२वी शिकत असलेल्या अध्ययन अक्षमता असणाऱ्या विद्यार्थ्यांना विशेष सवलती देण्याबाबत कळविले आहे. त्यात अध्ययन अक्षमता असल्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त करणे आणि त्याबाबतची कार्यपद्धती व अध्ययन अक्षमता असणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता द्यावयाच्या सुविधा व सवलती नमूद केल्या आहेत. मंडळ नियमावलीनुसार व शासनाच्या दि. ०७ सप्टेंबर, २००६ च्या शासन निर्णयानुसार अध्ययन अक्षमता विद्यार्थ्यांना (डिस्लेक्सिया, डिसग्राफिया, डिसकॅलक्युलिया) मंडळ नियमावलीतील सध्याच्या तरतुदीनुसार इ. १०वीला प्रविष्ठ होणाऱ्या अध्ययन अक्षमता विद्यार्थ्यांना ३० मिनिटे जादा वेळेची सवलत दिली जाते. शासनाने निर्णयात इ. १ली ते १२वी साठी विद्यार्थ्यांना सामान्य वेळेपेक्षा २५% जादा वेळ

देण्याचे आदेशित केले आहे. तरी शासन निर्णयानुसार इ. १०वीच्या अध्ययन अक्षमता असणाऱ्या विद्यार्थ्यांना परीक्षेच्या वेळी सामान्य वेळेपेक्षा २५% जादा वेळ म्हणजे एका तासाच्या पेपरला १५ मिनिटे, दोन तासांच्या पेपरला ३० मिनिटे, अडीच तासाला - ४० मिनिटे, तीन तासांच्या पेपरला - ४५ मिनिटे इतका वाढीव वेळ देण्यात यावा.

तरी अध्ययन अक्षमता विद्यार्थ्यांना वर नमूद केलेली विशेष सवलत आणि सुविधा सर्व संबंधितांच्या (शाळा, केंद्र संचालक, विद्यार्थी इ.) निदर्शनास आणाव्यात. या संवर्गातील कोणताही विद्यार्थी या विशेष सवलती अथवा सुविधापासून वंचित राहणार नाही, याची काटेकोर खात्री केली जावी. या सवलती / सुविधाची अंमलबजावणी सप्टेंबर / ऑक्टोबर-२००६ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेपासून करण्यात यावी.

विभागीय सचिव

विभागीय मंडळ, औरंगाबाद.

प्रत :

१) सर्व केंद्र संचालक यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव.

२) शिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद औरंगाबाद/ बीड / परभणी / जालना / हिंगोली यांना माहितीस्तव.

११. बारावीनंतर काय ?

डिस्लेक्सियामुळे होणाऱ्या समस्या या आयुष्यभर राहतात आणि जर या सवलती मिळाल्या नाहीत तर अशा मुलांना उच्चशिक्षणापासून वंचित राहावे लागते किंवा ती वारंवार नापास होतात व त्यामुळे त्यांच्यात नैराश्य वाढण्याची शक्यता असते. त्यामुळे अशा मुलांना या सवलती उच्च शिक्षणात सुद्धा मिळाल्या पाहिजेत म्हणजे त्यांच्यावरील विनाकारणचा ताण कमी होईल व ते आपले पुढील शिक्षण चांगल्या प्रकारे पूर्ण करू शकतील.

१२. मुलांच्या मानसिक समस्या

मुलांमध्ये वेगवेगळ्या मानसिक समस्या आढळून येतात. याची बरीच कारणे असू शकतात, मात्र महत्त्वाचे कारण म्हणजे त्यांच्यावरील वाढणारा ताण अथवा दडपण होय. ताण व दडपण कमी झाल्यास व योग्य योजना केल्यास त्या समस्येपासून मुलास सुटकारा मिळू शकतो व योग्य वातावरण न मिळाल्यास त्या समस्या वाढू शकतात.

ॲडजस्टमेंट रिॲक्शन :

सर्वसाधारणपणे मुलांचा वाढत्या वयानुसार बदलत्या संबंधांशी व वातावरणाशी संबंध येतो. हा आजार त्यांच्या वातावरणात बदल झाल्यामुळे व वातावरणातील ताणामुळे होतो. हा ताण संपल्यानंतर ती नेहमीसारखी वागू लागतात.

मुलांच्या वर्तणुकीत वेगवेगळ्या विकृती आढळून येतात.

हायपर कायनेटिक बिहेवियर :

बरीच मुले खोडकर असतात ही गोष्ट सामान्यपणे आढळून येते. मात्र काहींमध्ये हा खोडकरपणा इतका असह्य होतो की अशी मुलं आटोक्यात आणणे फार कठीण असते. अशा प्रकारची मुले सतत बेचैन

असतात. त्यांचे लक्ष कुठल्याही एका गोष्टीवर काही वेळ केंद्रित करणे अशक्य होते. त्यांचे मन सहजपणे विचलित होते. बऱ्याच मुलांत ही लक्षणे वय वाढल्यानंतर कमी होतात. मात्र, कमी झाली नाहीत तर त्यावर वेळीच सल्ला घेणे आवश्यक असते.

ADHD (Attention Defecit Hyperactive Disorder)

1) Inattention	१) एकाग्रता नसणे
2) Hyper Activity	२) चंचलता
3) Impulsitivity	३) भावनावश

एकाग्रता नसणे :

१) एखाद्या गोष्टीच्या बारकाव्यांवर लक्ष केंद्रित करू शकत नाही.

२) कुठल्याही कामात आणि खेळात लक्ष केंद्रित करू शकत नाही.

३) सांगितलेली गोष्ट लक्षात नसणे.

४) आज्ञेचे पालन करत नाही. गृहपाठ पूर्ण करत नाही आणि कुठलेही काम करण्यात अपयशी ठरतात.

५) कामाचे संघटन करण्यात अपयशी ठरतात.

६) आपल्या गरजेच्या वस्तू हरवतात. उदा. पेन्सिल, पुस्तक.

७) बाह्य उद्दीपकांमुळे लक्ष विचलित होते.

८) दैनंदिन कामे विसरतात.

चंचलता :

१) वळवळ आणि चुळबुळ करतात.

२) आपल्या जागेवर जास्त काळ बसू शकत नाहीत.

३) अनावश्यक धावपळ करतात.

४) खेळणे आणि फावल्या वेळेत काम करणे अवघड जाते. (चंचलतेमुळे)

५) जास्त बोलतात.

भावनावश :

१) प्रश्न पूर्ण होण्यापूर्वीच उत्तर देण्यास प्रारंभ करतात.

२) आपल्या पाळीची वाट पाहत नाहीत.

३) दुसऱ्यांना अडथळा निर्माण करतात.

विड्रॉल रिॲक्शन :

याउलट बरीच मुले एका ठिकाणी बसून राहतात. इतर मुलांत मिसळत नाहीत. त्यांना एकलकोंडेपणा आवडतो. ते लाजाळू व भित्रे असतात. ते इतरांशी मैत्री करू शकत नाहीत. त्यांची सहनशीलता फारच कमी असते.

मुलगा बेपत्ता आहे अशी जाहिरात आपण वर्तमानपत्रात व टी.व्ही.वर नेहमीच पाहतो. काही भीतीदायक परिस्थितीमुळे मुले काही दिवसांसाठी घरातून निघून जातात. हा प्रकार नुसत्या ताणामुळे असू शकतो. बऱ्याच वेळा हा फिटचादेखील प्रकार असतो. याला 'फ्यूग' म्हणतात. शाळेतील ताणामुळे देखील हे घडू शकते.

रात्री झोपेत चालणे :

बरीच मुले रात्री झोपेत उठून चालतात. घराबाहेर जातात व परत घरात येऊन आपल्या जागी झोपतात. त्यांना उठून बाहेर गेलेले लक्षात राहत नाही. झोपेतून दचकून जागे होणे याला नाईट टेरर म्हणतात.

फोबिया :

मुले रात्री झोपेतून भयभीत अवस्थेमध्ये दचकून जागी होतात. त्यांना घाम सुटतो, थरथरी येते व सकाळी उठल्यानंतर हे काहीही लक्षात राहत नाही. मुलांमध्ये वस्तूंची भीती आढळून येते. भीती वाटणाऱ्या वस्तू अथवा घटनांमध्ये जनावरे, शाळा, घाण, आजार, उंच ठिकाणे, मृत्यू यांचा समावेश असतो व त्यामुळे चक्कर येणे, थकवा येणे, घबराहट होणे, घाम येणे, उलट्या, थरथरी वगैरे त्रास होतो.

भीती साधारणपणे चार ते सात वर्षे वयात आढळून येते.

जनावरांची भीती व भीतीदायक स्वप्ने साधारणपणे तीन ते पाच वर्षे वयोगटात आढळून येतात.

एखाद्या मुलास पांढऱ्या सशाची भीती वाटू लागते. नंतर त्याला सर्व पांढऱ्या रंगाची जनावरे पाहिल्यानंतर भीती वाटू लागते व त्याची तीव्रता वाढल्यानंतर पांढरा रंग पाहिल्यानंतरदेखील भीती वाटू लागते. ही गोष्ट त्याला खूपच त्रासदायक होते.

जेव्हा मुलात शाळेत जाण्याची भीती निर्माण होते तेव्हा ही गोष्ट पालकांना खूपच त्रासदायक होते. जर मुलावर शाळेत पाठविण्यासाठी बळजबरी केली तर मूल बराच वेळ रडत राहते. बऱ्याच वेळेस त्याला उलट्या होतात. काहींच्या पोटात दुखायला सुरुवात होते तर काहींचे डोके दुखते आणि त्यामुळे साहजिकच शाळेत जाण्याचे टळते.

ही भीती उत्पन्न होण्याचे कारण म्हणजे मुलास आपल्या आईपासून वेगळे होण्याची चिंता लागलेली असते व मूल आईस सोडून सहजपणे शाळेत जाण्यास तयार नसते.

ऑबसेशन :

आपण बऱ्याच मुलांना रस्त्याने जाताना एक विजेचा खांब सोडून दुसऱ्या विजेच्या खांबास स्पर्श करून जात असताना पाहिले असेल. साधारणपणे सामान्य मुलांमध्ये अशी प्रवृत्ती आढळून येते व त्यास ऑबसेशन असे म्हणतात. मात्र, ही प्रवृत्ती मनोविकाराचे रूपदेखील धारण करू शकते. एखाद्या मुलाच्या मनात कुठल्याही वस्तूस स्पर्श करण्याचा विचार वारंवार येऊ लागतो आणि तो कितीही प्रयत्न करून त्या विचारास थांबवू शकत नाही आणि जोपर्यंत तो त्या वस्तूस स्पर्श करीत नाही, तोपर्यंत तो बेचैन राहतो.

बरीच मुले चिंताग्रस्तता या विकाराला बळी पडतात आणि त्यांच्या स्वभावात चिडखोरपणा येतो व त्याच्यात छातीत दुखणे, हातपाय थरथर

कापणे, श्वास वेगाने चालणे, पोट दुखणे, वारंवार लघवी येणे वगैरे लक्षणे आढळून येतात.

उदासीनता (खिन्नता) :

बरीच मुले खिन्नता या मनोविकाराचेदेखील बळी पडतात. यात मूल वारंवार रडू लागते. भूक लागत नाही. बरेच जण उलट्या करतात. बरेच जण झोपेतून भिऊन उठतात. बरेच आत्महत्यादेखील करतात.

झोपेत लघवी करणे :

कुठल्याही प्रकारची शारीरिक विकृती नसताना वयाच्या तिसऱ्या वर्षानंतर झोपेत लघवी करणे हीदेखील एक मनोविकृती होय.

साधारणपणे एक ते पाच टक्के मुले वयाच्या तिसऱ्या वर्षानंतर झोपेत लघवी करतात. जेव्हा ही मुले दररोज न चुकता झोपेत लघवी करतात तेव्हा त्यास प्रायमरी इनयुरेसिस म्हणतात. काही मुलांमध्ये काही काळानंतर झोपेत लघवी करणे बंद होते आणि बऱ्याच दिवसांनंतर पूर्ववत झोपेत लघवी करण्यास सुरुवात होते. त्यास सेकंडरी इनयुरेसिस म्हणतात. यावर योग्य तो औषधोपचार करणे आवश्यक असते.

काही मुले डोळ्यांना चांगले दिसत असतानाही वाचू शकत नाहीत. ती हुशार असतात. मात्र वाचता येत नसल्यामुळे ती त्या माध्यमाचा उपयोग आपले ज्ञान वाढविण्यास करू शकत नाहीत. ही अवस्था आयुष्यभर राहू शकते. त्यामुळे त्यास खिन्नता व न्यूनगंड निर्माण होतो. या विकृतीसाठी त्यांना विशिष्ट प्रकारचे शिक्षण द्यावे लागते.

अडखळत बोलणे :

दोन ते चार वर्षे वयाच्या मुलात अडखळत बोलण्याची सवय आढळून येते व त्याचादेखील मुलाच्या शिक्षणावर परिणाम होतो. बरीच मुले न्यूनगंडास बळी पडून शिक्षण सोडून देतात. शिक्षा झालेल्या मुलांत याची बरीच उदाहरणे आहेत.

बालगुन्हेगारी :

बालगुन्हेगारी हादेखील मुलांच्या वर्तणुकीतील बिघाड होय. बालगुन्हेगारीत मुलगा एकटा किंवा टोळीबरोबर आढळून येतो. जेव्हा मुले टोळीबरोबर गुन्हेगारी करतात. तेव्हा ते टोळीच्या नियमांचे पालन करतात व आपल्या टोळीशी निष्ठावंत असतात. त्यांच्याबरोबर शाळा चुकविणे, चोरी करणे, रात्री जास्त वेळ घराबाहेर राहणे वगैरे गोष्टी करतात. याचे प्रमाण मुलीपेक्षा मुलांमध्ये जास्त आहे. जेव्हा हा विकार मुलींमध्ये बळावतो तेव्हा त्या दुकानातून सामान चोरी करणे व वेगवेगळ्या लैंगिक विकृतीस प्रवृत्त होतात. या मुलांना वेळीच योग्य प्रकारचे शिक्षण दिल्यास अशा कामापासून परावृत्त करता येते. जेव्हा मूल एकटेपणाने गुन्हेगारीस प्रवृत्त होते तेव्हा त्यांना साध्या शिक्षणाने गुन्हेगारीपासून परावृत्त करणे कठिण होते व त्यावर मानसोपचार आवश्यक ठरतो.

व्यसनाधीनता :

मुले वेगवेगळ्या व्यसनांच्या आहारी जाऊ शकतात. मुलांमध्ये सध्या गुटखा खाण्याचे प्रमाण खूप वाढले आहे.

शारीरिक, मानसिक व सामाजिक या तिन्ही क्षेत्रांतील दोषांमुळे / समस्यांमुळे मनोविकृती निर्माण होऊ शकते. या तिन्ही क्षेत्रांतील बिघाड एकदुसऱ्यावर अवलंबून आहेत.

ऑटिझम :

लहानपणी मुलास आईकडून योग्य प्रकारचे प्रेम व शिक्षण न मिळाल्यास तो निरनिराळ्या मनोविकृतीस बळी पडू शकतो. योग्य प्रकारच्या वाढीसाठी त्याला लहान वयातील शिक्षण व अनुभव आवश्यक असतात. आईमध्ये काही आजार किंवा आई-वडिलातील भांडणे, आईचा लहानपणी मृत्यू वगैरे गोष्टींमुळे मुलाला लहानपणी योग्य ते शिक्षण मिळू शकत नाही व तो निरनिराळ्या विकृतीस बळी पडतो. ज्या मुलांमध्ये वयाच्या

पहिल्या वर्षी आईवर विश्वास निर्माण होत नाही अशा प्रकारची मुले दुसऱ्यापासून अलिप्त राहतात. शाळेत लाजाळू असतात. शाळेत विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देत नाहीत व अभ्यासात मागे राहतात. साधारणपणे ही गोष्ट लक्षात न आल्यामुळे ऑटिझम या मनोविकृतीस बळी पडतात.

मुलांमध्ये आढळून येणाऱ्या बऱ्याच लक्षणांबाबत लोकांचे बरेच गैरसमज आढळून येतात. उदा. मुलांचे वारंवार कारण नसताना रडणे, झोपेतून दचकून जागे होणे, झटके येणे वगैरे या प्रकारची लक्षणे आढळून आल्यास कोणी तरी करणी केली किंवा भानामती केली आहे असा समज होतो व मांत्रिक व जाणत्यांना दाखवितात. मनोविकारतज्ज्ञाचा सल्ला घेणे मात्र टाळतात.

वस्तुस्थितीत ही लक्षणेसुद्धा मनोविकाराची असतात व मनोविकारतज्ज्ञांचा सल्ला घेणे आवश्यक असते.

तेव्हा मुलांनाही मानसिक आजार होऊ शकतो आणि हा आजार त्यांच्या बदलत्या वर्तनावरून लक्षात येतो. तेव्हा त्याची वेळीच दखल घेऊन मानसोपचारतज्ज्ञांचा सल्ला घेणे मुलाच्या भावी आयुष्याच्या, निकोप आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाचे असते.

१३. शाळेत होणारी शिक्षा आणि तिचे दुष्परिणाम

शाळेत होणाऱ्या शिक्षेमुळे बरीच मुले शाळेत जात नाहीत. एकदा शाळेत जाणे सोडले की शिक्षण घेणे संपले. त्यांच्या आयुष्याला वेगळे वळण लागते. बरीच मुले व्यसनाधीनतेला बळी पडतात. काही गुन्हेगारीस प्रवृत्त होतात, काही वेगवेगळ्या मानसिक आजारांना बळी पडतात, काही आत्महत्यादेखील करतात, याचे भान शिक्षा देणाऱ्या शिक्षकांना नसते. त्यांचा गोड गैरसमज असतो की शिक्षेमुळे विद्यार्थी शिकतात किंवा सुधारतात. मात्र याचे विपरीत परिणाम होतात याची त्यांना जाण असणे आवश्यक आहे. (मुलांमधील वेगवेगळ्या मानसिक आजारांबद्दल वेगळा Chapter / पाठ आहे.)

काही मुलांमध्ये PTSD पोस्ट ट्रॉमॅटिक स्ट्रेस डिसऑर्डरसारखा आजार होतो.

यामध्ये मार खाल्ल्यामुळे, मार खाण्याच्या घटनेच्या जुन्या आठवणी (Flash back) येतात, आणि त्या माराच्या अनुभवाची प्रचीती वारंवार

होते आणि त्यामुळे भयानक यातना होतात.

या यातनांमुळे घबराट होणे, बेचैन होणे, विभ्रमावस्थादेखील होते. भीती वाटते. बऱ्याच जणांमध्ये चिडचिड, राग असतो. शिक्षक, शाळा, अभ्यास यांचे नाव जरी काढले तरी त्यांच्यात वरील लक्षणे उद्‌भवतात आणि त्यांना बऱ्याच वेळा शिक्षणापासून वंचित राहावे लागते.

याव्यतिरिक्त मुलांच्या मानसिक समस्या या सदराखाली मोडणाऱ्या सर्व समस्या मुलांमध्ये उद्‌भवू शकतात.

यास जबाबदार कोण ? शाळा, शिक्षक, शिक्षण पद्धती. हे सर्व टाळण्यासाठी या सर्वांचा बारकाईने विचार होऊन व आवश्यक ते बदल घडवून आणणे आवश्यक आहे.

मुलांना खेळ आवडतात :

मुलांना सतत वर्गात बसवून माराचा धाक दाखवून अभ्यास करायला लावणे गैरच. मुलांची शारीरिक क्षमता वाढविण्यासाठी शारीरिक हालचाली (Physical Activity) ची गरज असते. त्यांना खेळांच्या माध्यमातून शिकविणे आवश्यक आहे. मुलांना आपल्या मनातील गोष्टी बोलून दाखविण्याची मानसिक गरज असते. ती दडपल्यास त्यांच्यात भीती व वेगवेगळी शारीरिक लक्षणे निर्माण होतात. त्यांचा आत्मविश्वास कमी होतो.

शिस्त सांभाळण्यासाठी मारणे हा उपाय नाही. त्यांच्या आवडी-निवडी व क्षमतांचे विश्लेषण करून त्यांना अभ्यासात गुंतविणे आवश्यक आहे. त्यांच्या बोलण्याच्या क्षमतेची दखल घेणेदेखील आवश्यक आहे.

वर्गातील मुलांची संख्या :

मुलांची वर्गातील संख्या माफक असणे आवश्यक आहे. एका वर्गात ८० - १०० मुले कोंडवाड्याप्रमाणे भरल्याने शिक्षकांचा वेळ मुलांना

गप्प बसविण्यातच जातो. ते शिकविणार काय ? जास्त मुले वर्गात असल्यामुळे त्यांच्याकडे लक्ष देणे, त्यांच्या समस्या समजणे, त्यांना अभ्यासात गोडी निर्माण होईल यासाठी प्रयत्न करणे हे अशक्य असते.

एका वर्गात ४० मिनिटांच्या तासात एका मुलाला १ मिनिट देणेदेखील शक्य नसते.

होम वर्क (गृहपाठ)

मुलांना धडा न समजावताच पुस्तकात उत्तरांच्या खुणा करून देणे आणि घरून त्या लिहून आणायला सांगणे हा मुलांवर अन्याय आहे.

एक तर ६-७ तास शाळेत शिक्षेच्या दडपणाखाली न समजलेला अभ्यास करण्यात वेळ घालविणे आणि नंतर घरी आल्यानंतर न समजलेल्या विषयांचा गृहपाठ करणे आणि केला नाही तर बोलणी खाणे, मार खाणे अथवा वेगवेगळ्या शिक्षांना सामोरे जाणे हे सर्व प्रकार ताबडतोब थांबविले पाहिजेत आणि मुलांना आनंददायी वातावरणात त्यांना समजेल अशा पद्धतीनं शिकवण्याच्या आणि समजावण्याच्या पद्धती अवलंबिल्या पाहिजेत.

स्वत:चा राग मुलांवर काढणे

साधारणपणे मुलांना होणारी शिक्षा ही विद्यार्थ्यांना सुधारण्यासाठी नसते तर शिक्षक स्वत:चा राग मुलांवर काढतात. कारण शिक्षकांनाही समस्या असतात. समस्या घेऊन शिक्षक शाळेत येतात. त्यांच्यावर दडपण असते. अशा वेळी शिक्षकांनी रजा घेऊन घरी राहावे. मात्र आपल्या समस्येमुळे त्रस्त शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मारू नये. कारण या मारण्याचा बऱ्याच मुलांवर विपरीत परिणाम होतो आणि त्यांना वेगवेगळ्या समस्यांना सामोरे जावे लागते.

त्यांना खेळाच्या माध्यमातून शिकविणे आवश्यक आहे. मुलांना आपल्या मनातील गोष्टी बोलून दाखविण्याची मानसिक गरज असते. ती दडपल्यास

त्यांच्यात भीती व वेगवेगळी शारीरिक लक्षणे निर्माण होतात. त्यांचा आत्मविश्वास कमी होतो.

शिस्त सांभाळण्यासाठी मारणे हा उपाय नाही. त्यांच्या आवडी-निवडी व क्षमतेचे विश्लेषण करून त्यांना अभ्यासात गुंतविणे आवश्यक आहे.

१४. पालकांनी घ्यावयाची काळजी

१. वर्गात मुलांची संख्या जास्त असू नये हे पाहणे पालकांचे कर्तव्य आहे.

२. मुलांना बसण्यासाठी पुरेशी जागा आहे की नाही हे पाहणे पालकांचे कर्तव्य आहे. वर्गात मुलांना जवळजवळ बसविल्यास रेटारेटी होते. मुले भांडतात आणि विनाकारण शिक्षा भोगतात.

३. गृहपाठाचा मुलांना अनावश्यक ताण होणार नाही याची काळजी घेणे.

४. ज्या विषयात विद्यार्थी कच्चा आहे त्या विषयात शिकविण्यासाठी व विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सवलती दिल्या जातात की नाही हे पाहणे.

५. मुलगा लिहिण्या-वाचण्यात अथवा गणितात कच्चा असेल तर त्याच्याकडे विशेष लक्ष (Remedial Training) दिले जाते की नाही हे पाहणे.

६. मुलांना शिक्षक शिक्षा करीत नाहीत किंवा अपमानास्पद वागणूक देत नाहीत ना याची खात्री करून घेणे.

७. मुलांच्या काही समस्या असतील तर शाळेत समुपदेशक (Counsllor) व गरज पडल्यास मानसोपचारतज्ज्ञांच्या सल्ल्याने त्या सोडविण्यास मदत घेणे.

८. कुठल्याही शाळेत मुलांना शिक्षा होत असेल तर हेल्पलाईनच्या खालील नंबरवर संपर्क साधणे.

(०२४०) : २३७०४२३

९. मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी लक्ष दिले जाते की नाही याकडे लक्ष देणे.

१५. मतिमंदत्व : मुलांची समस्या

प्रत्येकालाच आपले मूल सुदृढ, निरोगी आणि हुशार असावे असे वाटते. मात्र काहींच्या वाट्याला दुर्दैवाने मंदबुद्धी मुले येतात.

मूल मंदबुद्धी आहे हे लक्षात आल्यानंतर आई-वडील उदासीनतेने ग्रासले जातात. बऱ्याच जणांचा या गोष्टीवर विश्वास बसत नाही. मतिमंदत्वाचा परिणाम एकट्या मतिमंदावरच होत नसून, कुटुंब आणि समाजावर होतो.

बऱ्याच वेळा मतिमंदत्व टाळता येण्यासारखे असते. योग्य वेळी योग्य काळजी घेतल्यास ते टाळता येते. मात्र दुर्दैवाने मंदबुद्धी कोणाच्या वाट्याला आलीच तर त्याला आहे त्या बुद्धीचा योग्य वापर कसा करता येईल याकडे लक्ष देणे आवश्यक असते.

मंदबुद्धीत बुद्धीची पातळी साधारण बुद्धीच्या लोकांपेक्षा कमी असते. मंदबुद्धी म्हणजे काय ?

ज्यांचा बुद्ध्यांक सरासरी बुद्ध्यांकापेक्षा कमी असतो अशांची गणना मंदबुद्धींमध्ये केली जाते. मतिमंदत्व हे मेंदूतील विकृतीमुळे किंवा मेंदूच्या कमी वाढीमुळे उद्‌भवते. मेंदूची विकृती ही मेंदूच्या रचनेतील विकृतीमुळे अथवा मेंदूच्या पेशीतील बदलामुळे होते. या बदलामुळे सामाजिक जीवनात

कार्य करण्याची क्षमता कमी होते. सामाजिक मूल्यांप्रमाणे वागण्यातील बदल व पाच वर्षांच्या आत वाढ खुंटणे, शैक्षणिकदृष्ट्या अपात्र होणे, मोठेपणी काम करू न शकणे अशा गोष्टी उद्‌भवतात.

मतिमंद मुलांमध्ये त्यांच्या बुद्ध्यांकानुसार चार प्रकार आढळतात. प्रत्येक प्रकारात लक्षणांची तीव्रता त्यांच्या बुद्ध्यांकावर अवलंबून असते. बुद्ध्यांक जेवढा कमी तेवढी मतिमंदत्वाची लक्षणे अधिक असतात.

वर्गीकरण :

१. सौम्य मंदबुद्धी - यात बुद्ध्यांक बावन्न ते पासष्टच्या दरम्यान असतो.

२. साधारण मंदबुद्धी - यात बुद्ध्यांक छत्तीस ते एकावन्नच्या दरम्यान असतो.

३. तीव्र मंदबुद्धी - बुद्ध्यांक वीस ते पस्तीसच्या दरम्यान असतो.

४. अतितीव्र मंदबुद्धी - यात बुद्ध्यांक वीसपेक्षा कमी असतो.

मतिमंदत्व - एक महत्त्वाची सामाजिक समस्या :

मतिमंदत्व हा जगात सर्वत्रच एक चिंतेचा विषय आहे. मतिमंद व्यक्ती तिच्या मंदबुद्धीच्या प्रकारानुसार दुसऱ्यावर अवलंबून असते. यातील बरेच लोक स्वत:च्या उदरनिर्वाहासाठी इतरांवर अवलंबून राहिल्याने समाजास भार बनतात, अशा व्यक्ती स्वत:च्या मानसिक अपंगत्वामुळे सामाजिक मूल्यांचे आकलन आणि पालन करू शकत नाहीत. यामुळेही निरनिराळ्या सामाजिक समस्या निर्माण होतात. मंदबुद्धी लोक चोरी, खून अशा प्रकारच्या गुन्ह्यांना सहज बळी पडतात आणि संधिसाधू लोक त्यांच्या दुर्बलतेचा फायदा घेऊन गुन्हेगारीसाठी त्यांचा दुरुपयोग करतात. स्त्रियांमध्ये अशा गुन्ह्यांव्यतिरिक्त वेश्याव्यवसायाचे प्रमाणही आढळून येते.

मतिमंद व्यक्तींचे आणि मुलांचे प्रमाण निश्चितपणे सांगणे कठीण

आहे. कारण अशा व्यक्तींचे निदान करण्याचे तसेच सर्वेक्षण करण्याचे प्रयत्न फारच थोड्या प्रमाणात झाले आहेत.

अमेरिकेत मतिमंद व्यक्तींचे प्रमाण ३% आढळते. भारतात अशी विशिष्ट आकडेवारी देणे कठीण आहे. दक्षिण भारतातील काही पाहण्यांमध्ये असे आढळून आले की, तेथील ११% मुले मतिमंद आहेत तसेच भारतात बारा दशलक्ष लोक मंदबुद्धी असल्याचे आढळून आले आहे.

मतिमंदत्वाची लक्षणे :

अतितीव्र मंदबुद्धी :

या प्रकारात बुद्ध्यांक २० पेक्षा कमी असतो. पाच टक्के मंदबुद्धीची मुले या सदरात आढळून येतात. यामध्ये मृत्यूचे प्रमाण अधिक असते. बऱ्याच जणांची वाढ खुंटलेली असते. डोक्याच्या आकारात विकृती आढळून येते. डोके आणि इतर अवयवांच्या आकारात सुसंगती आढळत नाही. यांच्यात अपंगत्व आढळून येते. यातील बरेच लोक अंथरूणाला खिळून असतात. ते चालू शकत नाहीत. बरेच जण स्वत: अन्न घेऊ शकत नाहीत. हाताला लागलेली वस्तू तोंडात टाकतात. काहींच्या डोक्याची हालचाल होते. बरेच जण बोटे चावतात. काही वारंवार रडतात व विविध प्रकारचे आवाज काढतात. लघवी, संडासवर त्यांचे नियंत्रण नसते. बरेच जण बोलू शकत नाहीत. काही फक्त पा, मा असे शब्द उच्चारू शकतात. त्यांना विविध प्रकारच्या चवीतील फरक समजत नाही. ते वाटेल ते खातात. स्वत:ला इजा करून घेतात. अशा क्रियांमुळे त्यांना आनंद होतो. त्यांच्या नित्याच्या गरजा पूर्ण करण्यासाठी इतरांच्या मदतीची आवश्यकता असते. त्यांना कुठल्याही प्रशिक्षणाचा उपयोग होत नाही. फेफरे येण्याचे प्रमाण जास्त आढळून येते.

तीव्र मंदबुद्धी :

यांचा बुद्ध्यांक वीस ते पस्तीसच्या दरम्यान असतो. तीव्र मंदबुद्धीच्या मुलांमध्ये स्नायूंची योग्य वाढ होत नाही. यांच्यात अनेक प्रकारची शारीरिक व्यंगे आढळतात, उदा. शारीरिक अपंगत्व, डोक्याच्या व चेहऱ्याच्या आकारात विकृती. वाढीचे टप्पे बऱ्याच उशिरा पूर्ण होतात, उदा. बसणे, चालणे, बोलणे वगैरे.

मूल पांगुळगाड्याचा वापर करू शकत नाही. त्यात विध्वंसक प्रवृत्ती आढळते. ते आपल्या वयाच्या मुलांबरोबर खेळात सहभागी न होता लहान वयोगटातील मुलांमध्ये खेळते. बोलण्याची क्षमता फारच कमी असते.

शिकविल्यानंतरसुद्धा ते स्वत:च्या नित्याच्या गरजा पूर्ण करू शकत नाही. जसजसे ते मोठे होऊ लागते तसतसे थोडेथोडे बोलू लागते व आपल्या गरजा दुसऱ्यांना सांगू शकते. स्वत:ची काळजी घेण्यासाठी त्याला विशिष्ट प्रशिक्षण देता येते. मोठे झाल्यावर दुसऱ्यांच्या नियंत्रणाखाली ते काही अंशी स्वत:ची काळजी घेऊ शकते, स्वत:चे संरक्षण करू शकते. मात्र स्वत:च्या उदरनिर्वाहासाठी कुठलेही काम करण्यास पात्र ठरू शकत नाही. जर अशा मुलांना योग्य वेळी प्रशिक्षण दिले नाही तर ते स्वत:ची काळजी घेण्यास असमर्थ ठरतात व त्यांना दुसऱ्यावर अवलंबून राहावे लागते.

साधारण मंदबुद्धी :

यांचा बुद्ध्यांक छत्तीस ते एकावन्न असतो. या प्रकारातील मूल चांगले बोलू शकते. त्याच्या स्नायूंची वाढ चांगली होते, परंतु समाजातील घडामोडींची त्याला जाणीव नसते. स्वत:ची काळजी मात्र ते योग्य प्रशिक्षणानंतरच घेऊ शकते. योग्य प्रशिक्षण मिळाल्यास समाजात दुसऱ्यांबरोबर कसे वागावे हे ते शिकू शकते. साधारणपणे दुसऱ्या इयत्तेनंतर

शिक्षण घेण्याची पात्रता नसते. माहितीच्या ठिकाणी ते एकटे फिरू शकते. ज्या कामासाठी बुद्धीचा वापर करण्याची गरज नाही, अशी कामे ते दुसऱ्याच्या मार्गदर्शनाखाली करू शकते.

अशा मुलांमध्ये शारीरिक वाढीचे टप्पे दुसऱ्या मुलांच्या मानाने उशिरा सुरू होतात.

सौम्य मंदबुद्धी :

बुद्ध्यांक बावन्न ते सदुसष्टच्या दरम्यान असतो. या मुलांमध्ये स्नायूंची चांगली वाढ होऊन त्यात योग्य संवेदनाशक्ती असते. वयाच्या पाचव्या वर्षापर्यंत सामान्य मुलांमध्ये आढळून येणारी उत्सुकता, आवड या मुलांमध्ये नसते. याचा परिणाम म्हणून ही मुले शांत, अचपळ असतात. ही मुले ज्याप्रमाणे चांगल्या मार्गांचा अवलंब करू शकतात, त्याचप्रमाणे दुष्ट प्रवृत्तींच्या आहारी जाऊ शकतात. त्यांच्या विचारशक्तीची वाढ होऊ शकत नाही. त्यांना एखाद्या विशिष्ट वातावरणात काम करावयास शिकविले तर ती केवळ त्याच वातावरणात काम करू शकतात. वयाच्या सोळा ते सतरा वर्षांपर्यंत ती शैक्षणिक क्षेत्रात सहाव्या इयत्तेपर्यंतदेखील यशस्वी होऊ शकत नाहीत. त्यांना सामाजिक नियंत्रणाबाबत मार्गदर्शन करता येते व ती मोठेपणी स्वत:चा उदरनिर्वाह करू शकतात.

न्यूनगंडत्व व मतिमंदत्व :

मतिमंद मुलाची जसजशी वाढ होते तसतसे त्याच्या लक्षात येऊ लागते की आपण इतरांपासून वेगळे आहोत. ही भिन्नता शारीरिकदृष्ट्या जाणवते. इतरांच्या तुलनेत आपण कर्तृत्वाबाबत कमी आहोत हेसुद्धा त्यांच्या लक्षात येते. ही जाणीव त्यांच्यात कमतरतेची भावना निर्माण होण्यास कारणीभूत होते. इतर लोकसुद्धा 'तू काही करू शकत नाहीस, तू बुद्दू आहेस' वगैरे सांगून त्यांची ही भावना अधिक दृढ करतात. अशा

प्रकारची न्यूनगंडाची भावना सौम्य मंदबुद्धीच्या मुलांत अगदी सहजपणे निर्माण होते. ही न्यूनगंडाची भावना त्यांच्यात खिन्नता, सामाजिक अलिप्तता निर्माण होण्यास कारणीभूत ठरते. बऱ्याच वेळेस समाजात योग्य मान न मिळाल्यामुळे गुन्हेगारीची भावना त्यांच्या मनात वाढू लागते.

साधारणपणे खेळ मुलांच्या व्यक्तिमत्त्वाच्या वाढीसाठी आवश्यक आहेत. खेळांच्या माध्यमातून परस्परांशी संबंध प्रस्थापित करण्याची शिकवण त्यांना मिळते. मतिमंद मुलांमध्ये हे माध्यम उपयुक्त ठरत नाही. कारण साधारण बुद्धीची मुले त्यांना आपल्याबरोबर खेळू देत नाहीत.

संवेदनक्षमता :

बऱ्याच मतिमंद मुलांना कमी प्रमाणातील संवेदना समजू वा जाणवू शकतात. त्यामुळे त्यांना त्रास होत नाही. मात्र, या मुलांना जास्त तीव्र संवेदना त्रासदायक होतात व त्यामुळे निरनिराळ्या प्रकारचे वर्तणुकीतील दोष निर्माण होऊ शकतात. कमी संवेदन शक्तीमुळे वागण्यात उतावळेपणा निर्माण होऊ शकतो. उतावळ्या मुलांत शिकण्याची व सामाजिकीकरणाची क्षमता कमी असल्यामुळे तडजोड करणे अशा मुलांना कठीण जाते. त्यामुळे ती साधारण मुलांबरोबर राहू शकत नाहीत. सामान्य मुले त्यांना आपल्यापासून दूर करणे, आपल्या गटातून वगळणे, शिक्षा देणे इत्यादी मार्गांचा अवलंब करतात. त्यामुळे अशा मुलांमध्ये सहज चिडण्याची प्रवृत्ती बळावू लागते आणि त्यांची ही वृत्ती इतरांना व आई-वडिलांना त्रासदायक होते. ते सहजगत्या निराशेला बळी पडतात.

कमी संवेदनक्षमता असलेली मुले तीव्र संवेदना होणाऱ्या घटना टाळतात आणि जेथे कसल्याही प्रकारचा आवाज येणार नाही किंवा दुसऱ्यांशी संबंध येणार नाही अशा ठिकाणी जातात आणि एकलकोंडी बनतात.

शाळा आणि मतिमंद :

सर्वसाधारणपणे आई-वडिलांच्या अपेक्षा मुलाने खूप शिकावे अशा असतात व त्याला अनुसरून मुलांना चांगल्या शाळेत घालण्याचे आई-वडिलांचे प्रयत्न असतात. सौम्य मंदबुद्धीच्या मुलांची वाढ पाच वर्षांपर्यंत सर्वसाधारण मुलांच्या वाढीप्रमाणेच होत असल्यामुळे त्यांच्यात काही कमतरता आहे हे लक्षात येत नाही. सहाव्या इयत्तेपर्यंत ते कसेबसे पास होतात. मात्र पुढील शिक्षणास असमर्थ असतात. त्यामुळे ही मुले शाळेत जाणे टाळण्याचा प्रयत्न करतात. दिलेला अभ्यासक्रम करून उत्तीर्ण होणे त्यांना शक्य होत नाही. मात्र, खेदाची गोष्ट ही की या मुलांना बऱ्याच कारणांमुळे वरच्या वर्गात बढती मिळत राहते व आयुष्यातील महत्त्वाचा प्रशिक्षणाचा काळ वाया जातो.

साधारणपणे अशा मुलांना शाळेत अभ्यास न केल्यामुळे शिक्षा मिळते व घरीदेखील शाळेत नियमित न गेल्यामुळे शिक्षा मिळते. त्यामुळे निराश होऊन अशी मुले गुन्हेगारीस प्रवृत्त होतात. मुलांच्या बौद्धिक क्षमतेनुसार त्यांना शिक्षण व प्रशिक्षण देणे आवश्यक असते. अशा मुलांना सामान्य बुद्धीच्या मुलांबरोबर स्पर्धा करणे शक्य नसते.

अशा मुलांना साधारणपणे पंधरा वर्षांपर्यंत प्रशिक्षण देणे शक्य असते. नंतर ते कठीण जाते. मात्र, या कालावधीत आई-वडील त्यांच्याकडे विशेष लक्ष देत नाहीत. लहान वयात लहान आहे मोठा झाल्यावर सुधारेल, जसजसे वय वाढेल त्यात सुधारणा होईल, या आशेवर त्यांच्याकडे दुर्लक्ष केले जाते.

मात्र, लहान वयात त्यांच्यातील सुप्त गुणांचा शोध घेऊन त्यांना उत्तेजन देणे व योग्य प्रशिक्षण देणे आवश्यक असते. बऱ्याच अंशी त्यांना स्वत:च्या गरजा भागविण्यासाठी प्रशिक्षित करता येते. पंधरा वर्षांनंतर हे काम अतिशय कठीण असते.

लहान वयातच आई-वडिलांना जेव्हा मुलांच्या मतिमंदत्वाची कल्पना दिली जाते, त्यांना ते सहजासहजी पटत नाही. त्यांना स्पष्ट सांगूनदेखील की, यांच्यात सामान्य बुद्धीच्या मुलांसारखी वाढ होणे शक्य नाही व अशी अपेक्षा करणे चूक आहे, हे त्यांना पटत नाही व आशेचा किरण कोठे सापडेल म्हणून बऱ्याच ठिकाणी फिरतात. बरेच जण डॉक्टर्स, जाणते आणि मांत्रिकांचा सल्ला घेतात आणि त्यांच्या आयुष्यातील महत्त्वाचा काळ वाया घालवितात. दहा ते बारा वर्षे वयाचे मूल झाल्यानंतर हे सहसा त्यांच्या लक्षात येते. मात्र, या काळात प्रशिक्षण देण्याचे काम कठीण होत जाते. अशा मुलांना योग्य वेळी ओळखणे फार महत्त्वाचे आहे. या कामात माता-पित्यांचा आणि प्राथमिक शिक्षकांचा फार महत्त्वाचा वाटा आहे.

मतिमंद मुलांच्या समस्येकडे बारकाईने पाहिल्यास असे लक्षात येईल की, या मुलांकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे.

मतिमंदांच्या शाळा आपल्या देशात फार कमी आहेत.

मतिमंदांचे प्रमाण पाहता अशा मुलांसाठी प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी एक जरी शाळा असली तरी ती कमी पडण्यासारखी आहे.

१६. अध्ययन अक्षमता तपासणी

मुलांच्या तपासण्या :

१. शारीरिक तपासण्या – मज्जातंतू संस्था, दृष्टी, श्रवण

२. शैक्षणिक प्रशिक्षण (Academic Skills) तपासण्या

१) बुद्ध्यांक

२) शैक्षणिक प्रशिक्षण चाचणी (Academic Skills Test) (लिहिणे, वाचणे, स्पेलिंग, गणित)

३) बोलण्याच्या तपासण्या

४) विशेष गुण (Special Ability) तपासण्या.

३) मुलांमधील मानसिक तपासण्या

१) विशेषत:ADHD अटेंशन डेफिसिट हायपर इक्विटी डिसऑर्डर

२) भावनिक विकार

३) बोलण्यातील व भाषेतील बिघाड.

अध्ययन अक्षमता तपासणी :

१) IQ Testing मध्ये :

a) Weschler Intelligence Scale (WISC)

या तपासणीमध्ये लिहिण्या व वाचण्याची गरज नसते म्हणून ही तपासणी अशा मुलांसाठी उपयुक्त असते.

२) वाचण्याची क्षमता तपासणी :

Grade Based Reading Assessment केली जाते.

वाचण्यातील विशिष्ट चुकांची नोंदणी केली जाते.

३) स्पेलिंग तपासणी :

चुकांमधील विशिष्ट प्रकार (Pattern) शोधणे आणि त्यावर उपचारात्मक उपाय सुचविणे.

४) गणिताच्या क्षमतेची तपासणी :

बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार यामध्ये कुठल्या क्षेत्रात चुका होतात हे तपासणे.

५) एकाग्रता : एकाग्रता तपासण्यासाठी चाचणी घेतली जाते.

या सर्व तपासण्या करण्यामागचा उद्देश त्या मुलाचा सखोल अभ्यास करणे आणि त्या मुलांत कोणत्या समस्या आहेत हे तपासणे आणि त्यावर उपचार IEP (Individual Education Programme आखणे) हे महत्त्वाचे असते.

मुलाची योग्य प्रगती होत नसेल अथवा वर्गात त्रास देत असेल व खोड्या करीत असेल तर वरील पूर्ण तपासण्या करून घेणे आणि त्यानुसार त्यावर उपचार करणे हे त्याचे उत्तर ! मारणे व शिक्षा देणे हे उत्तर नाही.

१७. मुलांसाठी परिणामकारक सूचना
(पालक व शिक्षकांसाठी)

१. मुलांचे लक्ष आपल्या सूचनेकडे केंद्रित करायला लावणे.
२. आवाज उंच व चिरका नसावा.
३. आवश्यक व मुद्देसूद सूचना कराव्यात.
४. सकारात्मक सूचना द्याव्यात.
५. सूचनापालन करण्यासाठी योग्य अवधी द्यावा.
६. सूचनेचे पालन केल्यास गुण देणे, बक्षीस देणे व पालन न केल्यास गुण न देणे, बक्षीस न देणे.
७. क्षमतेप्रमाणे काम करण्याच्या सूचना कराव्यात.
८. एका वेळी जास्त सूचना देऊ नयेत.
९. वारंवार त्याच सूचना करू नयेत.
१०. अस्पष्ट सूचना करू नयेत.
११. नकारात्मक (आवाजात वा शब्दांत) सूचना करू नयेत.
१२. प्रश्नार्थक सूचना करू नयेत.
१३. अपमानकारक शब्द वापरू नयेत.

आपल्या शिक्षणपद्धतीबद्दल बरेच काही सांगणारी एक गोष्ट....

एकदा एका जंगलातील प्राणी, पक्षी, मासे, खार, ससा, कुत्रा वगैरेंनी मिळून सर्वांसाठी एक शाळा काढण्याचे ठरविले. त्यांनी अभ्यासक्रम ठरविण्यासाठी बोर्ड (मंडळ), तयार केले. त्यांनी त्यामध्ये उडणे, पोहणे, खोदणे, पळणे वगैरे विषय ठरविले. सर्वांना सर्व विषय सक्तीचे करण्यात आले.

प्रथम पक्ष्यांना उडण्याची ट्रेनिंग देण्यात आली. त्यात त्यांना A+ ग्रेड मिळाला. त्यांना अजून जास्त प्रावीण्यासाठी ट्रेनिंग दिली. त्यांचा ग्रेड A++, A+++, A++++ असा वाढत गेला आणि उडण्याच्या कौशल्यात पक्ष्यांनी प्रावीण्य मिळविले. दुसरा विषय खंदणे, खंदण्याच्या शिकवण्याला सुरूवात झाली. पहिल्या दिवशी पक्ष्यांची चोच जखमी झाली आणि त्यांना उडताना त्रास होऊ लागला. त्यांचा उडण्याचा ग्रेड कमी होऊ लागला. A++++ वरून ग्रेड घसरला आणि घसरत घसरत F (Fail) पर्यंत आला. त्यांच्यावरील सक्तीमुळे त्यांना खोदता तर आलेच नाही मात्र उडतासुद्धा येणे कठीण झाले.

तशीच अवस्था दुसऱ्या प्राण्यांचीदेखील झाली. मासे पाण्याबाहेर आले आणि तडफडून मेले.

आपल्या शिक्षण पद्धतीत असेच होत आहे. बऱ्याच जणांना असलेल्या क्षमता गमावण्याची वेळ येत आहे. त्यामुळे आता शिक्षणव्यवस्थेशी संबंधित सर्वांनीच यावर विचार करून शिक्षणव्यवस्थेत बदल घडवून आणण्याच्या दृष्टीने काही सकारात्मक पावले उचलायला हवीत आणि त्यासाठीच, मुलांच्या पर्यायानं देशाच्या भवितव्यासाठीच माझा हा प्रयत्न आहे. आशा आहे शिक्षणक्षेत्राशी संबंधित सर्वांना म्हणजेच शिक्षक व पालकांना आपल्या विद्यार्थ्यांच्या व पाल्यांच्या समस्या सोडविण्यासाठी याचा उपयोग होईल.

शुभचिंतन

आपल्या देशात आता शिक्षण हा बालकांचा हक्क असल्याचे भारतीय संविधानाने मान्य केले आहे; पण प्रत्यक्षात काय दिसते ? असंख्य मुले अजूनही शिक्षणापासून वंचित आहेत. जी मुलं शाळेत दाखल होतात ती सर्व टिकून राहत नाहीत. जी टिकून राहतात त्यांची गुणवत्ता चिंतेची बाब ठरते. तथाकथित 'गुणवंतां'च्या गुणांच्या टक्केवारीत सतत वाढ होत राहावी यासाठी पालक व शिक्षक यांचा केवढा आटापिटा चालतो ! पण अभ्यासात मागे रेंगाळणाऱ्यांकडे लक्ष द्यायला कुणाला सवड आहे ? त्यांच्या अडचणी समजून घेण्याची आस्था व दृष्टी कुठे आहे ? इच्छा तरी कुठे आहे ? त्यांच्यावर 'बॅक बेंचर्स' म्हणून शिक्का मारला जातो. अशी मुले कायम उपेक्षित राहतात. पर्यायाने समाजाचे हे मनुष्यबळ पूर्णपणे विकसित होण्याऐवजी खुरटत जाते. मुले ही राष्ट्रीय संपत्ती आहे. हे जर खरे, तर ही एकप्रकारे राष्ट्रीय हानीच नाही का ?

मुलांचे शैक्षणिक मागासलेपण ही केवळ शैक्षणिक समस्या नसून ती सामाजिक चिंतेचीही बाब आहे. ती सोडविण्यासाठी नुसती भावनिक सहानुभूती पुरेशी नाही. त्यासाठी शास्त्रीय दृष्टिकोनाची व उपचारपद्धतींचीही नितांत गरज आहे.

"The problem of the backward child is as much a social as an educational issue ..... In education as in medicine, in training the mind as in healing the body,

efficient practice is to be achieved only by a scientific approach."

या क्षेत्रातील प्रख्यात संशोधक डॉ. सिरील बर्ट यांचे हे उद्‌गार अर्थपूर्ण आहेत.

आकाराने लहान, पण आशयाने समृद्ध असलेल्या या पुस्तकाचा पालक व शिक्षक यांना निश्चित लाभ होऊ शकेल. छोटी छोटी प्रकरणे व शास्त्रीय अंगाने मुद्देसूद मांडणी यामुळे त्यात विषयाचा नेमकेपणा व शैलीचा नेटकेपणा जाणवतो. लेखकाचे सखोल चिंतन, प्रदीर्घ व्यासंग व अनुभवसिद्ध शास्त्रशुद्ध विवेचन ही या लेखनाची जमेची बाजू आहे. या विषयाच्या संबंधातील डॉ. कादरी यांची कळकळ कौतुकास्पद आहे. 'एका अध्ययन – अक्षमता असलेल्या मुलाच्या भावना' हे पत्र अंत:करणाचा ठाव घेणारे आहे. 'मुलांसाठी परिणामकारक सूचना' नि:संशय उपयुक्त ठरणाऱ्या आहेत.

पालक व शिक्षक या उद्‌बोधक व मार्गदर्शक पुस्तकाचा यथायोग्य लाभ घेतील व आपल्या पाल्यांच्या व विद्यार्थ्यांच्या सुप्त क्षमतांचा शोध घेतील. त्यांच्यात क्वचित दिसून येणाऱ्या अध्ययनविषयक मागासलेपणाची कारणे जाणीवपूर्वक तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली दूर करण्याचा शक्य तो सर्व प्रयत्न करतील आणि आपलीच ही मुले विकसित झाल्याचा आनंद प्रत्यक्ष अनुभवतील अशी आशा आहे. ही जाण व जाग निर्माण होण्यासाठी हे पुस्तक सर्वार्थाने मार्गदर्शक ठरो, ही शुभकामना.

या पुस्तकाची निर्मिती करून शैक्षणिक साहित्यात मोलाची भर घातल्याबद्दल डॉ. कादरी यांचे मन:पूर्वक अभिनंदन

– वि. वि. चिपळूणकर
शिक्षणतज्ज्ञ

औरंगाबाद
२.११.२००६

बालकांच्या सहज शिक्षणाची सूत्रे

हसू द्या, खेळू द्या	हसत खेळत शिकू द्या
गाऊ द्या, नाचू द्या	गात - नाचत शिकू द्या
ऐकू द्या, बोलू द्या	ऐकत - बोलत शिकू द्या
हिंडू द्या, बघू द्या	हिंडत - बघत शिकू द्या
तोडू द्या, जोडू द्या	तोडत - जोडत शिकू द्या
शोधू द्या - विचारू द्या	शोधत - विचारत शिकू द्या
लिहिण्याचा हव्यास नको	गणिताचा अट्टहास नको
गृहपाठाचा जाच नको	परीक्षेचा काच नको
शिक्षेचा धाक नको	शिस्तीचा बडगा नको
आपली स्वप्नं लादणं नको	त्यांच्या स्वप्नांचा भंग नको
झटकू नका, झिडकारू नका	दिशा दाखवा, मदत करा
समरस व्हा, कौतुक करा	मनसोक्त त्यांच्यावर प्रेम करा
हसत - खेळत उड्या मारत	गाणी गुणगुणत, नाचत - बागडत
ऐकत - बोलत, हिंडत - बघत	तोडत - जोडत वाढू द्या, उमलू द्या
वाढता - वाढता शिकू द्या	एकेक पैलू उकलू द्या
त्यांचं त्यांना वाढू द्या	त्यांचं त्यांना फुलू द्या

- वि. वि. चिपळूणकर
शिक्षणतज्ज्ञ

Compliments

I have read the book 'मुलांच्या क्षमता आणि शैक्षणिक समस्या'. I am happy to say that the book is written nicely on the problems of learning ability of children and their potential. Dr. Qadri has nicely analysed various problems of the students and gave their solutions. He has tackled number of aspects of psychological problems faced by the patients and gave their solutions.

I had visited Dr. Qadri's Hospital at Padegaon, Aurangabad and saw various facilities available at the Hospital and also number of poor patients taking Treatment in this Hospital. The Hospital is well-equipped and almost all the treatment facilities are available at the Hospital.

It was brought to my notice that certain educational facilities are given by govt. of Maharashtra to dyslexic students, upto XII standard only. I think these students should be continued to get all these facilities for higher education also so that the dyslexic students unnecessary distress should be reduced and they can become good citizens.

Dr. A. M. Vare
Medical Director
M.G.M. Medical College,
Aurangabad.

शुभेच्छा !

डॉ. कादरी हे औरंगाबाद येथील ख्यातनाम मनोविकारतज्ज्ञ, पण त्यांची एवढीच ओळख पुरेशी नाही हे त्यांनी या 'मुलांच्या क्षमता आणि शैक्षणिक समस्या' या पुस्तकाद्वारे दाखवून दिले आहे.

प्रचलित शिक्षणपद्धतीतील दोष बहुचर्चित आहेत. या पद्धतीतील लवचिकतेचा अभाव, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीऐवजी काही ठराविक विषयांना दिलेले महत्त्व, दैनंदिन जीवनात व व्यवहारात उपयोगी न ठरणारे अभ्यासक्रम वगैरे. आजकालच्या पालकांच्या मुलांकडून अपेक्षा फार वाढल्या आहेत, असेही म्हटले जाते; पण याच परीक्षांना सामोरे जाताना काही मुले यशस्वी ठरतात तर काही अपयशी. या 'अपयशी' असा शिक्का मारलेल्या मुलांना इतरांच्या तुलनेत अपयश का आले? त्यांच्या गरजा काही वेगळ्या होत्या का ? याचा मात्र जागरूकपणे विचार होताना फारसे आढळत नाही.

प्रस्तुत पुस्तक याच पैलूवर विज्ञाननिष्ठ पद्धतीने प्रकाश टाकते. सुरूवातीलाच वेगवेगळ्या प्रकारच्या बुद्धिमत्ता, त्या कशा ओळखायच्या याची चर्चा झाल्यामुळे मुलांना केवळ 'अपयशी' असा शिक्का न मारता त्यांच्या प्रश्नांकडे ढोबळपणे न बघता या मुलांकडे वेगळ्या प्रकारची बुद्धिमत्ता असू शकेल हा आशेचा किरण वाचणाऱ्याच्या मनात निर्माण होतो. अशा मुलांची नक्की समस्या शोधून काढण्याकडे वाचकांचा कल व्हावा यासाठी हे पुस्तक नक्कीच मदत करेल.

वेगवेगळ्या वैद्यकीय परिभाषेतील संज्ञा लेखकाने सोप्या करून सांगितल्या आहेत. त्याचप्रमाणे व्यवहारातील उदाहरणांनी त्या स्पष्ट केल्या आहेत.

माणसातल्या शारीरिक अपंगत्वापेक्षा मानसिक अपंगत्व जास्त गंभीर ठरू शकते. याची कारणे अनेक आहेत, असे अपंगत्व वेळेवर ओळखले न जाणे, ओळखले तरी त्याचा स्वीकार न करणे, स्वीकारले तरी सामाजिक दडपणामुळे खुलेपणाने उपचार न करणे आणि उपचार करायचे ठरवले तरी त्यासाठी सुविधा उपलब्ध नसणे किंवा या सुविधांची माहिती नसणे अशा या प्रश्नाच्या अनेक बाजूंवर या पुस्तकात उपाय सापडेल, योग्य दिशा मिळेल असा मला विश्वास वाटतो.

अध्ययन अक्षमता असणारेदेखील अलौकिक कार्य करू शकतात, याचे लेखकाने दिलेले उदाहरण अशा मुलांबद्दल सकारात्मक दृष्टिकोन बनवायला मदत करेल. त्याचबरोबर अशा मुलांशी वागताना काय काळजी घ्यावी याबद्दलच्या मौलिक सूचनांचा नक्कीच उपयोग होईल.

या देशाचे उद्याचे नागरिक शारीरिक व मानसिकदृष्ट्या निरोगी असावेत ही पालक, शिक्षक, समाज, शासनव्यवस्था या सर्वांची जबाबदारी आहे. त्यामुळे या पुस्तकाचे स्वागत सर्व स्तरांतून व्हावे ही अपेक्षा आणि मुलांवरचा 'अपयशी' हा शिक्का पुसला जाऊन त्यांना योग्य मार्गदर्शन मिळावे, या शुभेच्छा !

डॉ. अजित श्रॉफ
डीन
एम.जी.एम. मेडिकल
कॉलेज, औरंगाबाद.

अभिप्राय

डॉ. ए.ए. कादरी हे एक अभ्यासू व प्रयोगशील मनोविकारतज्ज्ञ आहेत. त्यांच्याकडे मानसोपचारासाठी येणाऱ्या रुग्णांची, त्यांच्या मानसिक समस्यांची व त्यांच्या वर्तनांची ते सूक्ष्मपणे, अभ्यासू वृत्तीने चिकित्सा करतात. समस्येच्या मुळात जाऊन शोध घेतात. त्यामुळे त्यांचे या संदर्भातील निष्कर्ष महत्त्वाचे ठरतात. युवकांच्या मानसिक समस्या, वृद्धांच्या मानसिक समस्या, स्त्रियांच्या मानसिक समस्या आणि मुलांच्या मानसिक समस्या तसेच शहरातील व्यक्तींच्या व ग्रामीण भागातील व्यक्तींच्या मानसिक समस्या अशा विविध अवस्थांतील समस्यांच्या कारणांचे वेगळेपण ते शोधतात. त्यातूनच त्यांच्या मानसोपचारांची दिशा निश्चित होते. त्यांच्या अभ्यासाचा उद्देश सामाजिक स्वरूपाचा असतो. त्यामुळे त्यांच्या अभ्यासाला, मानसोपचारांना एक सामाजिक मूल्य प्राप्त होते.

त्यांच्या या पुस्तकांत त्यांनी मुलांची बौद्धिक क्षमता, अक्षमता आणि त्यांतून येणाऱ्या शैक्षणिक समस्या आणि त्यांची मानसिक क्षमतेत होणारी परिणती यांचे सोदाहरण विवेचन केले आहे. कुटुंबातील सदस्य मुलांच्या शारीरिक स्वास्थ्याकडे लक्ष देतात, त्यांच्या शारीरिक आजाराकडे लक्ष देतात पण त्यांच्या मानसिकतेकडे मात्र दुर्लक्ष करतात. हे वास्तव डॉ. ए. ए. कादरी यांनी या पुस्तकातून स्पष्ट केले आहे. मुलांची बौद्धिक क्षमता लक्षात घेऊनच पालकांनी त्यांच्या शिक्षणविषयक वाटचाली लक्षात घ्याव्यात, असे डॉ. कादरी सांगतात, हे महत्त्वाचे आहे.

डॉ. ए. ए. कादरी यांनी आपल्या या पुस्तकात मुलांची बौद्धिक क्षमता – अक्षमता, त्यांतून निर्माण होणाऱ्या शैक्षणिक व मानसिक समस्या, दहावी – बारावीनंतर मुलांनी निवडावयाचे अभ्यासक्रम, अध्ययनातील अडचणी, शैक्षणिक वातावरण इत्यादी बाबींची मानसशास्त्रीय चिकित्सा अत्यंत साध्या-सोप्या भाषेतून केली आहे. म्हणूनच सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या डॉ. कादरी यांचे हे पुस्तक मला महत्त्वाचे वाटते.

– शरद व्यवहारे

(मा. श्री. वि. वि. चिपळूणकर यांच्या घरी, डॉ. ए. ए. कादरी यांनी 'मुलांच्या क्षमता आणि शैक्षणिक समस्या' या त्यांच्या प्रकाशित होणाऱ्या ग्रंथाचा आशय सांगितला. त्यांचा संवाद ऐकताना मनात आलेल्या विचारांचे काव्यरूप !)

व्यथा

माझी अशी कशी शाळा ?
घडविना मी माझ्यामधला ....?

आई चढवी दोन्ही भिवया
बाबा म्हणती गेला वाया
गुरुजी रोजच छिलती काया
कुणी लाविना लळा..... !

माझे चुकते कुठे कळेना
माणुसकीचा वृक्ष दिसेना
गर्द सावली मला मिळेना
काहिली सोसेना मजला... !

जसे चेहरे जगी वेगळे
एकच माती, मळे आगळे
तसे बुद्धीचे प्रांत निराळे
देश एकची जरी सकला ... !

साधू कोणाशी संवाद ?
लपवू कुठवर माझा छंद ?
पिंजऱ्यात मज केले बंद
आभाळ द्याहो मला ... !

– श्री. दि. इनामदार

अध्ययन अक्षमता असलेल्या मुलाच्या भावना

प्रिय आई बाबांस...
तुमचा नेहमी असतो
एकच हेका
अरे बाळ ! तू अभ्यासात
मागे कसा ?....
आणि
शाळेत मास्तरांचा
एकच हेका
'ढ' मुलांनी मागच्या
बाकावर बसा ....
आई,
तुला म्हणून सांगतो
'बाबां'ची मला भीती वाटते
त्यांच्या अपेक्षेची मनावर
सतत टांगती तलवार असते
आई,
गणित लवकर कळत नाही
अक्षर पटकन वळत नाही
वाचताना शब्दांची होते घाई
आणि
आमची अशी बघून दशा
हुशार मुलांच्या घोळक्यात
पिकतो हशा....

पण आई ....
चित्र काढण्यात वर्गात
माझ्याइतकं कुणी पटाईत नाही !
वर्गात मी एकटाच नाही
निता छान गाते,
विजय भन्नाट कविता रचतो !
तरीही सांग ना आई?
'परीक्षेत' आम्ही का नापास ठरतो ?
तू
शोध घे आई !
आमच्या अडचणीवर नक्कीच
उपाय असेल !
आम्हाला योग्य सल्ला, मदत
मिळाली तर...
तू
बघ आई, मी
निवडलेल्या क्षेत्रात...
उत्तम चित्रकार असेन

शैक्षणिक समस्येनी त्रस्त
तुझा लाडका

मानसिक आरोग्य केंद्र, पडेगाव, औरंगाबाद.

दूरध्वनी : (०२४०) २३७०४२३, २३७०७२३

शिक्षा न देणाऱ्या शाळेस बक्षीस योजना

मानसिक आरोग्य केंद्र, पडेगाव, औरंगाबादतर्फे शिक्षा न देणाऱ्या शाळेला १०,००० रुपये बक्षीस व फिरती ढाल जाहीर करण्यात आली आहे. ही योजना सध्या औरंगाबाद शहरापुरती मर्यादित राहील.

या योजनेत सहभागी होण्यासाठी खालील अटींची पूर्तता करीत असल्याचे हमीपत्र पात्र शाळांनी भरून द्यावयाचे आहे. ही योजना सर्व माध्यमांच्या शाळांसाठी खुली आहे.

योजनेसाठी नियम :

१) शाळेमध्ये कुठल्याही विद्यार्थ्यास शारीरिक किंवा मानसिक कुठल्याही प्रकारची शिक्षा दिली जाऊ नये.

२) विद्यार्थ्यांना अभ्यासात काही समस्या असतील किंवा त्यांच्या वर्तनासंबंधी काही समस्या असतील तर संबंधित पालकाशी चर्चा करूनच सोडवल्या पाहिजेत व गरज भासल्यास समुपदेशक मानसोपचारतज्ज्ञांचा सल्ला व मार्गदर्शन घेतले पाहिजे.

३) विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले पाहिजेत.

४) शाळा या सर्व गोष्टींचे पालन करत असल्याचे सर्वेक्षण विशिष्ट समितीमार्फत केले जाईल. यामध्ये विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांची मुलाखत घेऊन निर्णय घेण्यात येईल.

ही बक्षीस योजना १ जानेवारी २००७ पासून अमलात येईल आणि विजेत्या शाळेला बक्षीस शक्यतो १४ नोव्हेंबर २००७ म्हणजे बालकदिनी देण्यात येईल. एकापेक्षा जास्त शाळा बक्षिसपात्र ठरल्यास ड्रॉ पद्धतीने निवडलेल्या शाळेला बक्षीस देण्यात येईल.

संपर्क :

मानसिक आरोग्य केंद्र, पडेगाव, नाशिक रोड, औरंगाबाद.

नवश्री बुक स्टॉल, दत्त मंदिरासमोर, औरंगपुरा, औरंगाबाद.